स्वादमय सेवेचा • राजस्थानी थाळी •
स्वादिष्ट.. रुचकर
भोजनाचा आस्वाद घ्या..
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर फोन: 2327060, 9850799850


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

गोड गोड हुरडा
गरम गरम वनभोजन
सहकुटुंब मित्रपरिवारासह
निसर्गाचा
मनमुराद आनंद घेऊया
२५ पेक्षाही अधिक
मनोरंजनाची साधने व
इतर बरेच काही
संपूर्ण परिवारासह
साईबनमध्ये
हुरडा पार्टी
आकर्षक पॅकेज उपलब्ध
आजच संपर्क करा
वेळ : सकाळी ९ ते सायं ५
डॉ. कांकरियांचे साईबन
साईबन कृषी पर्यटन केंद्र,
एम.आय.डी.सी. मागे, अहमदनगर
हेल्पलाईन - 9112288622
9850500905 / 9096639368

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०७.०२.२०२५ | अंक नं. २८६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# नगर शहरामध्ये उद्योजकाला वर्दळीच्या रस्त्यावर भरदिवसा लुटले; सोन्याच्या अंगठ्या, चेन लंपास

## आनंदधाम रस्त्यावर दुपारी १२ वाजता घडली घटना; मोटारसायकलवरुन आलेले दोन जण पसार; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – एमआयडीसीमधील उद्योजकाला दोघांनी भरदिवसा आणि मोठी वर्दळ असलेल्या आनंदधाम रस्त्यावर लुटल्याची घटना शुक्रवारी (७ फेब्रुवारी) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. राजाराम राय (वय ६२, रा.एमआयडीसी, नगर) असे या उद्योजकाचे नाव आहे. त्यांच्या गळ्यातील २ तोळ्याची सोन्याची चेन आणि प्रत्येकी १ तोळ्याच्या सोन्याच्या २ अंगठ्या या चोरट्यांनी लंपास केल्या आहेत.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, उद्योजक राजाराम राय यांचा एमआयडीसी परिसरात राजलक्ष्मी इंडस्ट्रीज नावाची कंपनी आहे. त्यांच्या कंपनीचे अनेक ग्राहक शहर परिसरात आहेत. राय हे शुक्रवारी कामानिमित्ताने नगर शहरात आले होते व चाणक्य चौक मार्गे आनंदधाम रस्त्याने भवानीनगर येथे त्यांच्या ओळखीचे अजित कर्नावट यांच्याकडे आपल्या मोपेडवर जात होते. दुपारी १२ च्या सुमारास माजी खा. स्व. दिलीप गांधी यांच्या घराच्या समोरील बाजूस त्यांच्या पाठीमागून पल्सर मोटारसायकलवर दोघेजण आले. त्यातील एकाने डोक्यात हेल्मेट घातलेले होते.

त्यांनी मोटारसायकल राय यांच्या मोपेडला आडवी लावून त्यांना थांबविले व पोलिस असल्याच्या थाटात त्यांना तुम्ही हेल्मेट का नाही घातले? तुमचा वाहन चालविण्याचा परवाना दाखवा असे दटावले. त्यानंतर तुम्हाला कळत नाही का, या भागात किती चेन स्नॅचिंगच्या घटना घडत आहेत. तरीही तुम्ही गळ्यात सोन्याची चेन, हातात अंगठ्या घालून फिरता. कालच या परिसरात चेन स्नॅचिंग झाली आहे. त्यामुळे तुम्ही गळ्यातील चेन आणि अंगठ्या काढून ठेवा असे म्हणत त्यांना त्या काढायला लावल्या. त्यानंतर खिशातून एक कागद काढला व यात ठेवा त्या वस्तू असे म्हणत त्यांना वस्तू कागदात ठेवायला लावल्या.

त्यानंतर तुमच्या गाडीची डिक्की उघडा असे म्हणाले. त्यामुळे राय यांनी डिक्की उघडली. त्यावेळी त्यांनी कागदाची पुडी त्यांच्या हातात देत हे दागिने डिक्कीत ठेवा आणि या परिसरातून पुढे घेल्यावर ते गळ्यात आणि हातात घाला. असे म्हणून तेथून मोटारसायकलवर निघून गेले. काही वेळाने राय यांना शंका आल्याने त्यांनी डिक्कीतील कागदाची पुडी उघडून पाहिली असता त्यात दागिन्यांच्या ऐवजी दगड होते.

त्या दोघा भामट्यांनी आपली नजर चुकवून हातचलाखी करत दुसरीच पुडी आपल्या हातात देवून आपली फसवणूक केल्याचे राय यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी घडलेला प्रकार त्यांच्या ओळखीचे अजित कर्नावट यांना सांगून त्यांच्या सोबत कोतवाली पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात दोघा भामट्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

IMS AHMEDNAGAR
ATTENTION
BBA/ BCA ASPIRANTS
CET IS COMPULSORY FOR BBA / BCA ADMISSION
LAST DATE TO FILL CET FORM
10th Feb, 2025
NO ADMISSION TO BBA/BCA WITHOUT CET
For More Details
M. 98231 00756 / 98900 70077
B.P.H.E. Society's
INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES CAREER DEVELOPMENT AND RESEARCH
IMS Campus, Station Road, Ahilyanagar - 414 001.
NAAC Accredited Institute
Best Institute Award by SP Pune University
Website : www.imscdr.ac.in

# दररोज बिबट्याच्या भीतीखाली जगतेयं जनता, वनविभागकडे 'पीआर व रेस्क्यू' टीम आहे का?

## पालकमंत्री महोदय, वनविभाग काय केडगावची पुनरावृत्ती व्हायची वाट बघतोयं का?



नगर – नगर शहर परीसरासह नगर तालुक्याच्या गावागावात बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असताना वन विभागाकडून फक्त पाहणी करून बिबट्यांच्या ठशांचे फोटो काढणे, काही ठिकाणी पिंजरा लावला तर लावणे अशी थातूरमातुर कामे केली जात आहेत. मात्र दररोज बिबट्याच्या भीतीखाली वावरणाऱ्या नागरिकांना दिलासा काही मिळत नाही. मागील वर्षीप्रमाणे जर केडगाव सारखी आपत्कालीन परिस्थिती उद्भवली तर नगरच्या वन विभागाकडे पीआरटी (प्रायमरी रिसपॉन्स टिम) आणि रेस्क्यू टीम आहे का? जर नसेल तर पालकमंत्री साहेब यात लक्ष घालणार का? की केडगावच्या घटनेची पुनरावृत्ती व्हायची वाट पाहताय? असा सवाल उपस्थित होत आहे.

मागील वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यातच केडगावच्या नागरी वसाहतीमध्ये बिबट्याची मध्यरात्री झालेली एन्ट्री त्यानंतर परिसरातील नागरिक मध्ये पसरलेली दहशत आपण पाहिलीच असेल. पहिल्यांदाच नगरच्या उपनगरात नागरी वसाहतीमध्ये बिबट्याची झालेली इंट्री केडगाव मधील अनेक नागरिकांना याची कल्पना देखील नव्हती. त्यामुळे सकाळी सकाळी कामासाठी घराबाहेर ज्यावेळेस आपण पडू त्यावेळेस आपण बिबट्यासाठी एक सावज बनू ही त्यांच्या ध्यानीमनी देखील आले नसेल. ज्या घराच्या आडोशाला दबा धरून बिबट्या बसला होता. त्यातील अनेक घरांनी व शेजारीपाजाऱ्यांनी पाहिल्यामुळे याची माहिती परिसरातील नागरिकांना फोनद्वारे कळवल्यामुळे अनेकजण सावध झाले खरे पण ज्यांना याची कल्पना नव्हती ते मात्र बिबट्याच्या हल्लयामध्ये गंभीर जखमी झाले.

### अनेक नागरिक झाले होते बिबट्याच्या हल्लयात जखमी

अनेक नागरिकांवर या बिबट्याने हल्ला चढवत घायाळ करून सोडले. त्यावेळेस देखील बैल गेला आणि झोपा केला याची प्रचिती केडगावकरांना वनविभाग एक तास उशिरा आल्यानंतर आली. वनविभाग, नागरिक तसेच पोलीस प्रशासनामध्ये थोडी बाचाबाची देखील झाली. प्रशासनाला यावेळी नागरी रोषाला सामोरे जावे लागले होते. त्यानंतर सकाळी ९ वाजल्यापासून बिबट्याने दहशत माजवत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत अनेक नागरिकांना घायाळ केले होते. वन विभागाकडे पिंजरा व बिबट्याला पकडण्यासाठी जाळ्याशिवाय काहीही नव्हते. त्यानंतर बिबट्याची दहशत पाहता व नागरिकांचा वाढत चालेला रोष यांची दखल घेत नगरच्या वन विभागाने तात्काळ संगमनेरच्या रेस्क्यू टीमला पाचारण केले.

### संगमनेरच्या रेस्क्यू टीममुळे बिबट्या झाला होता जेरबंद

कदाचित ही टीम नगरमध्येच असती तर या बिबट्याला पहिल्या दोन तासातच जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले असते. परंतु काय करणार, रेस्क्यू टीमच नसल्यामुळे बनविभाग फक्त पिंजरा आणि जाळी घेऊन केडगावमध्ये पोहोचला होता अन् संगमनेरच्या टिम ची वाट पाहत वेळ मारून नेत होता. परंतू त्यादरम्यान बिबट्याच्या हल्लयात अनेक जण गंभीर जखमी झाले होते. संगमनेरची रेस्क्यू टीम तब्बल दोन–तीन तासानंतर आल्यानंतर या रेस्क्यू टीम मधल्या शार्प शूटरने भुलीचे इंजेक्शनचा डोस मारल्यानंतर बिबट्या बेशुद्ध झाला आणि अनेक तास बेफान झालेल्या या बिबट्यास पकडण्यास वन विभाग यशस्वी झाला होता व केडगावकरांनी मोकळा श्वास घेतला.

### केडगावची पुनरावृत्ती होण्यासारखीच सध्या निर्माण झालीय परिस्थिती

पालकमंत्री, आजही हीच परिस्थिती नगरमध्ये होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सीना नदी परिसर, काठवण खंडोबा रोड यासह नगर तालुक्यातील अकोळनेर, भोरवाडी, विळद, जेऊर, सारोळा कासार, कामरगाव या परिसरात बिबट्यांचा वावर आता दिसू लागला आहे. यामध्ये प्रामुख्याने काटवण खंडोबा आणि सीना नदीचा परिसर नगरच्या अत्यंत जवळचा असल्यामुळे व नागरी बसाहती ही मोठ्या प्रमाणात आहेत. जर केडगावची पुनरावृत्ती कदाचित पुन्हा झाली तर वनविभागकडे रेस्क्यू टीम व महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार पीआरटी टिम नसेल तर पहिले पाढे पंचावन म्हणावे लागतील व नागरिकांना रोजच जीव मुठीत धरून जगावे लागेल. बिबट्या शहराच्या या भागात घुसल्यानंतर रेस्क्यू टीम व पी आर टी टी नसल्यामुळे वनविभागाला इतर ठिकाणाहून पाचारण करेपर्यंत बिबट्या किती लोकांवर हल्ला चढवेल ही कल्पना न केलेलीच बरी!

### बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वेळीच ठोस उपाययोजनांची गरज

पालकमंत्री, आपण आपल्या स्तरावर आदेश काढून वन विभागाला तशा सूचना देण्याची गरज आहे. जेणेकरून रेस्क्यू टीम ताबडतोब उपलब्ध होऊ शकेल व बिबट्यामुळे दहशतीखाली जगणारी शहरालगतची जनता सुटकेचा निश्वास तरी एकदा सोडेल. कारण ऊसतोडीमुळे आश्रयासाठी व आपल्या भक्षासाठी बिबट्या आता नागरी वसाहतीकडे वावरताना दिसू लागले आहेत व यातूनच ते नरभक्षक देखील होत आहे. या बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वेळीच ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय..
कापड बाजार, अहमदनगर.

आता प्रत्येक शुक्रवार व शनिवार
मोफत तपासणी उपचार
रुग्णांच्या व्याधी कमी करण्या करिता
नोबल हॉस्पिटल परिवारातर्फे
अनोखी आरोग्य योजना...
दर शुक्रवारी
मुत्रविकार व किडनीविकार तज्ञ, शल्यचिकित्सक
डॉ. अमेय सांगळे
(किडनी व मूत्रविकार तज्ञ)
MBBS, M.S. (General Surgery), Mch (Urosurgery)
यांची मोफत ओपीडी
दर शनिवारी
इतर विविध व्याधींवर उपचारा करीता खालील तज्ञ उपलब्ध
डॉ. राघव पारगांवकर
(मेंदू व मणके विकार सर्जन)
MS Gen. Surgery, Mch Neuro Surgery
डॉ. अद्वैत गिते
(मेंदू विकार तज्ञ)
MD Medicine, DM Neurology
डॉ. सुशांत घुमरे
(जॉईंट रिप्लेसमेंट सर्जन)
MBBS, MS, (Ortho), DNB (Ortho), MNAMS
डॉ. प्रिती थोरात
(नेत्रविकार तज्ञ)
MBBS, DOMS, IOC
डॉ. यमिता साखरे-जाधव
(किडनी विकार तज्ञ)
MBBS, MD (Medicine), DNB Nephrology)
* अत्याधुनिक उपचार सुविधा * हृदयरोग विभाग * मेंदू विकार निदान व शस्त्रक्रिया विभाग
* किडनी व मूत्र विकार उपचार विभाग * पोट व आतडे विकार आणि जनरल सर्जरी विभाग
* अस्थिरोग, जॉईंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया विभाग * नेत्ररोग उपचार व शस्त्रक्रिया विभाग
* पुर्णवेळ अतिदक्षता विभाग तज्ञ उपलब्ध
अत्यंत अद्ययावत सेवा सुविधा
सर्व प्रमुख कंपन्यांसाठी कॅशलेस सुविधा
नगर जिल्ह्यातील सर्वप्रथम, प्रशस्त व परिपूर्ण आरोग्य मंदिर
एशियन नोबल हॉस्पिटल प्रा लि.
प्रेमदान चौक, मनमाड रोड, अहिल्यानगर
0241 - 2421290-91-92, 0241 - 2421911-12-13
मोफत उपचार अधिक माहितीसाठी संपर्क : 86055 52266

Mount Litera Zee School
NURTURING POTENTIAL, UNLEASHING BRILLIANCE.
CBSE AFFILIATION NO 1130870
Admissions open 2025-26
Daund Road, Arangaon,Ahilyanagar 414006
FUTURE READY SCHOOL
माऊंट लिटेरा झी स्कूल अरणगांव, दौंड रोड, अहिल्यानगर
8263063744 / 7038730387
नर्सरी ते दहावी पर्यंत दर्जेदार शिक्षण प्रणाली

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## नगरचे यशस्वी 'स्ट्रगलर'






पाथर्डीत जन्मलेला, वांबोरी, राहुरीत माध्यमिक शिक्षण घेतलेला व सारडा कॉलेजात पदवी घेतलाला आपला नगरकर हिरो म्हणजे आशिष अशोक निनगुरकर.

आज एक यशस्वी लेखक, कवी, गीतकार, पटकथाकार म्हणून त्याची ओळख आहे. 'स्ट्रगलर' नामक त्याचे पुस्तक सकाळच्या 'प्रिमीअर'मधील लेखांचे कलेक्शन असून, विशेष म्हणजे या पुस्तकातील २० यशस्वी मराठी कलाकारांचा 'स्ट्रगल' आणि माहिती वाचकांना प्रेरणादायी ठरू शकते.

आज उंच भराऱ्या घेणाऱ्या कलाकाराने करियरच्या प्रसंगी, प्रारंभी संघर्ष केलेला असतो. स्वतःची कलावंत म्हणून ओळख प्रस्थापित करण्याच्या वाटचालीत अनेक मानापमान, निराशा, अपेक्षाभंग सहन केलेले असतात.

कुणाला मोक्याच्या क्षणी संधी मिळते. गुरू लाभतात. मदत मिळते. कितीही प्रस्थापित सेलिब्रिटी कलावंत असला तरी त्याला 'स्ट्रगल' चुकलेला नसतो. हा कलाकार मात्र त्याचा हा स्ट्रगल विसरू शकत नाही.

त्याच्या आजच्या यशाला, ग्लॅमरला, भुलणाऱ्या सर्वसामान्यांना त्यामागची तपश्चर्या, सतत चिकाटीने केलेले प्रयत्न, संघर्ष दिसत नाही. सिनेनाट्यप्रेमी वाचकांना त्यांच्या लाडक्या, आवडत्या मराठी कलाकारांचा हा 'स्ट्रगल' समजावा म्हणून नगरच्या भूमीपुत्र लेखकाचे पुस्तक वाचायला पाहिजे.

# पतसंस्थेच्या कर्ज वसुलीसाठी सहकार खात्याने कायद्यामध्ये बदल करुन कडक धोरण अवलंबावे



सुहास मोहरकर

नगर - महाराष्ट्र शासनाने सहकार क्षेत्राच्या संबंधित नियम व कायदे हे महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे दरम्यान त्या काळातील परिस्थितीस अनुसरून केलेले असून तर त्याला तब्बल ६४ वर्ष झाल्यामुळे त्यातील बहुतांश कायदे व नियम कालबाह्य झाल्यामुळे शासनाने सध्याच्या परिस्थितीचा विचार करून त्यात अमुलाग्र बदल करणे आवश्यक असल्याचे मत सहकारी पतसंस्था अन्याय निवारण समन्वय समिति अहिल्यानगरचे अध्यक्ष सुहास मोहरकर यांनी मांडले.

९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या शिर्डी येथील आंतरराष्ट्रीय सहकार परिषद २०२५ च्या पार्श्वभूमीवर आणि त्या निमित्ताने राज्यस्तरीय व अन्य राज्यातून मंत्री महोदय येण्याच्या निमित्ताने होणाऱ्या कार्यक्रमात हा महत्त्वाच्या विषयावर सहकार क्षेत्रातील तसेच पतसंस्थेच्या संचालकांनी वाचा फोडून न्याय द्यावा अशी मागणी या पत्रांमध्ये केली आहे. सध्याच्या परिस्थितीत राज्यातील जवळपास २५ हजार ते २७ हजार पतसंस्था असून त्यातील बहुतेक पतसंस्था केवळ कर्ज वसुली वेळेवर होत नसल्यामुळे आर्थिक संकटात आहेत. कर्ज वसुलीसाठी प्रामुख्याने सहकार अधिनियम कलम १०१ आणि सहकार न्यायालयाच्या वतीने कलम ९१ च्या अनुषंगाने पतसंस्था कारवाई करीत असून तसेच निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अंतर्गत चेकद्वारे दिलेल्या रकमेबाबत कोर्टात केस केसेस चालतात. मात्र कलम ९१ अंतर्गत दिलेल्या न्यायालयाच्या निर्णय हा अधिक लवचिक असल्यामुळे अलीकडे या केसच्या आदेशाला अनेक कर्जदार दाद देत नाही. तसेच कलम १०१ हा अत्यंत वेळ काढून आणि गुंतागुंतीचा असून त्यामध्ये चौकशीचे अनेक टप्पे आहेत आणि दिलेल्या निर्णयात जंगम जप्तीचा प्रामुख्याने समावेश असून त्यामध्ये पोलीस यंत्रणेचा वापर करावा लागतो या कारवाईत अनेक अडचणी येतात त्यामुळे निर्णय होऊन सुद्धा प्रभावी जंगम जप्ती करण्याचे धोरण नसल्यामुळे कागदावरच निर्णय राहून प्रत्यक्षात कर्जदाराकडून रक्कम वसूल होत नाही तसेच स्थावर जप्ती आदेशान्वये जप्त करण्यात येणाऱ्या स्थावरच्या नोंदी ह्या महसूल खात्याकडून होणाऱ्या दिरंगाईमुळे तसेच त्यानंतर सहकार खात्यामार्फत अपसेट व लिलाव मंजुरी हे टप्पे असल्यामुळे जास्त वेळ वाया जाऊन प्रभावी वसुली होण्यास दिरंगाई होते, तसेच १३८ मध्ये दंड व शिक्षेची तरतुद असली तरीही त्यामध्ये समन्स बजावणी, बेलेबल वॉरंट, नॉन बेलेबल वॉरंट ही कामे पोलीस यंत्रणेमार्फत बजावणीची असल्यामुळे त्यातही खूप वेळ वाया जातो या प्रकारामध्ये अक्षम्य विलंब होत असल्यामुळे आज कोर्टात १३८ च्या अनेक केसेस वर्षानुवर्ष प्रलंबित असल्याचे अनेक पतसंस्थेचे तक्रारी असल्याबाबत सुहास मोहरकर यांनी मत व्यक्त केले.

९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सहकार क्षेत्रातील अडचणीचा विचार करताना प्रामुख्याने कडक नियम करण्याचा तसेच संस्थानी जप्त केलेल्या स्थावरचा ताबा देण्याचा अधिकार जिल्हा उपनिबंधक आणि जिल्हाधिकारी यांना अधिकार असताना देखील प्रत्यक्षात या अधिकाराचा उपयोग करीत नसल्यामुळे अनेक कर्ज प्रकरणे पेंडिंग पडलेले असून कर्ज वसुलीचे काम थंडावले आहे त्यामुळे अनेक पतसंस्था आर्थिक संकटात सापडलेल्या आहेत.

किरकोळ चुकांबाबत तसेच कर्जदारांनी केलेल्या तक्रारी अर्जाचा शहानिशा न करता अर्जात केलेल्या आरोप खरे किंवा खोटे बाबत विचार न करता आरोप खरे आहेत या भावनेने संबंधित सहकारी कार्यालयाकडून पतसंस्थेचे चौकशी नेमून देत असल्याच्या अनेक पतसंस्थांचा अनुभव आहे या प्रकारात चौकशी करणे ऐवजी मार्गदर्शन करून पतसंस्थेला सहकार्य करण्याचे धोरण सहकार खात्याने ठेवण्याबाबतचा विचार व्हावा असे मत मोहरकर सुहास यांनी आपल्या प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात व्यक्त करून सध्या अडचणीत असलेल्या पतसंस्थांना न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.

# अवैध धंद्यांवर कारवाई न झाल्यास हप्ते देणाऱ्या अवैध धंद्यांच्या रेटकार्डसह यादी जाहीर करणार

### उपोषणाला दहा दिवस उलटून देखील पोलीस प्रशासनाची बघ्याची भूमिका, शिर्डीच्या धर्तीवर एमआयडीसी हद्दीत कारवाई का करत नाही?



एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंदे बंद करावे व सदर पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या बदलीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) महिला आघाडीच्या वतीने सहभागी झालेले कार्यकर्ते.

नगर - सुरु असलेल्या उपोषणाच्या दहाव्या दिवशी गुरुवारी (दि.६ फेब्रुवारी) दखल घेतली जात नसल्याने पोलीस प्रशासनाचा निषेध नोंदविण्यात आला. गांजा, हातभट्टी, मटका, जुगार, बिंगोसह गुन्हेगारी जोमाने सुरू आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक झोपेचे सोंग घेत असून, या भागात अवैध धंद्याबरोबरच गुन्हेगारी देखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे. दरोडा, लूटमार, चोऱ्या यांसारखे गंभीर गुन्हे सातत्याने घडत असल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. शिर्डी येथील दुहेरी हत्याकांड नंतर तातडीने पोलीस निरीक्षकाची बदली करुन अवैध धंद्यावर कारवाई होते, मात्र एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीतील बोल्हेगाव येथे एकाचा खून झाला असताना व काहींचा खूनाचा प्रयत्न झालेला असताना देखील पोलीस प्रशासन ठोस भूमिका घेत नसल्याचा प्रश्न उपोषणकर्त्यांनी उपस्थित केला. तर अवैध धंद्यांवर कारवाई न झाल्यास हप्ते देणाऱ्या अवैध धंद्यांचा रेटकार्डसह यादी जाहीर करण्याचा इशारा रिपाईचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के यांनी दिला. मागील दहा दिवसापासून उपोषण करत असलेल्या रिपाई महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्षा ज्योतीताई पवार यांची तब्येत खालवली असताना जिल्हा रुग्णालयातील अधिकाऱ्यांनी त्यांना उपोषण सोडून हॉस्पिटलमध्ये उपचार घेण्याचे सुचवले आहे. मात्र त्यांनी अवैध धंद्यांवर कारवाई करुन सदर पोलीस अधिकाऱ्याची बदली होत नाही, तो पर्यंत उपोषण सुरु ठेवणाचा पवित्रा घेतला आहे.

एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंदे बंद करावे व सदर पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या बदलीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) महिला आघाडीच्या वतीने या उपोषणात कावेरी भिंगारदिवे, ज्योती साठे, जयश्री गायकवाड, शितल नाटेकर, सारिका गांगुर्डे, सविता भालेराव, सारिका साळवे, संपदा म्हस्के, दानिश शेख, नईम शेख, संदीप वाघचौरे, विजय शिरसाठ, गुलाम शेख, जमीर सय्यद, जावेद सय्यद, अजीम खान, देवेंद्र वाघमारे, शहाबाज शेख, प्रतीक शिंदे, मुन्ना भिंगारदिवे, विल्सन रूकडीकर, प्रवीण भिंगारदिवे, अकिल शेख, राहुल गाडेकर, दिलनवाज शेख, योधन भालेराव आदींसह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

सध्या परिस्थितीमध्ये सर्वात जास्त गांजाची विक्री एमआयडीसी हद्दीत होताना दिसून येत आहे. अनेक युवक गांजाच्या नशेला बळी पडत असून, नशेमध्ये बेभान होऊन त्यांच्याकडून अनेक गंभीर गुन्हे घडत आहे. यामध्ये अनेक अल्पवयीन मुले असून, त्यांचे भवितव्य उध्वस्त होत आहे. हातभट्टी पिऊन अनेक युवक मृत्युमुखी पडले आहेत. व्यसनाच्या आहारी गेलेल्यांचे संसार उध्वस्त झाले आहेत. सोरट, बिंगो, जुगार, मटका या अवैध धंद्यावर रोजंदारीवर कमवलेले पैसे युवक गमावत आहे. त्यामुळे अनेक कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली असून, काही कुटुंबीय कर्जबाजारी झाले असल्याचे म्हंटले आहे.

या अवैध धंद्यावर पोलीस प्रशासनाकडे मागणी करून देखील कारवाई केली जात नाही. अवैध धंदेवाले देखील बिनधास्तपणे पोलिसांना हप्ते चालू असल्याचे उघडपणे बोलत आहे. एक प्रकारे अवैध धंद्यांना पाठबळ देण्याचे काम होत असल्याचा आरोप रिपाई महिला आघाडीच्या वतीने करण्यात आला आहे.

# निंबळक बायपास रोडवरील टायर दुकानातून टायरची चोरी

नगर - टायरच्या दुकानासमोर साखळीने लॉक केलेले टायर कोणीतरी अज्ञात चोरट्याने साखळीचे लॉक तोडून ३७ हजार रुपये किमतीचे टायर चोरून नेल्याची घटना निंबळक बायपास रोड वरील दत्त टायर दुकानासमोर ६ फेब्रुवारी रोजी रात्री घडली.

चोरट्यांनी दत्त टायर दुकानासमोर साखळीने बांधून ठेवलेले मालट्रक चे २० हजार रुपये किमतीचे २० टायर, आणि १७ हजार रुपये किमतीची कारचे ३५ टायर चोरून नेले.

याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी नंदू दिगंबर कदम (रा. मांजरसुंबा, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार चौधरी करीत आहे.

# उसने दिलेल्या पैशांसाठी मानसिक छळ केल्याने तरुणाची आत्महत्या

### केडगावच्या दोघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल



मयत कृष्णा काळे

नगर - हातउसने दिलेल्या पैशाकरिता, भाडेतत्वावर घेतलेला ट्रॅक्टर माघारी न देता पैशाची सतत मागणी करून मानसिक त्रास दिल्याने कृष्णा श्रीनाथ काळे (वय २०, रा.शिवाजी नगर, केडगाव) या तरुणाने रेल्वे गाडी खाली आत्महत्या केल्याची घटना ५ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास घडली होती. या प्रकरणी दोघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबतची माहिती अशी की मयत कृष्णा काळे याचा ट्रॅक्टर त्याच्या ओळखीचा शरद रामचंद्र जाधव याने त्यांचे शेतीचे कामासाठी भाड्याने जामखेड येथील जिकरी गावी घेऊन गेला होता. त्यानंतर जुलै २०२४ महिन्यात कृष्णा काळे याचा साखरपुड्याचा कार्यक्रम असल्याने शरद जाधव याने त्याचे कार्यक्रमासाठी मदत म्हणून ३० हजार रुपये हातउसने दिले होते. मागील काही दिवसांपासुन कृष्णा काळे यास ट्रॅक्टरची गरज असल्याने तो वारंवार शरद जाधव यास ट्रॅक्टरची मागणी करीत होता. परंतु शरद जाधव हा आज देतो, उद्या देतो असे म्हणुन वेळ मारुन नेत असे. ३० जानेवारी रोजी कृष्णा काळे हा जिकरी या गावी गेला असता त्याला तेथे शरद जाधवच्या सासरवाडीत ट्रॅक्टर मिळुन आला नाही. त्यावेळी कृष्णाने शरद जाधवकडे ट्रॅक्टरबाबत विचारणा केली असता, शरद जाधव याने तुझा ट्रॅक्टर आणुन देतो असे सांगितले. परंतु त्याने ट्रॅक्टर आणून दिला नाही. ३ फेब्रुवारी रोजी शरद जाधव याने शिवीगाळ, दमदाटी करुन तु मला ५० हजार रुपये दे तेव्हाच तुझा ट्रॅक्टर देतो असे बोलला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी कृष्णा याने शरद जाधव याला ३० हजार रुपये आत्ता देतो व बाकीचे राहिलेले पैसे नंतर देतो असे सांगीतल्यावर शरद जाधव याने मला पुर्ण ५० हजार रुपये पाहिजेत, तेव्हाच तुझा ट्रॅक्टर तुला परत देईन असे म्हणाला. त्यानंतर दुपारी शरद जाधव सोबत एक इसम असताना तो कृष्णा यास तुझ्याकडुन पैसे देणे होत नसेल तर तु जीव देऊन टाक तसेच शरद जाधव सोबत असलेल्या इसमाने सुध्दा तु समोर असलेल्या रेल्वे पटरीवर जीव देऊन टाक असे म्हणाले. त्यावेळी कृष्णा खुप निराश झाला.

या नंतर ५ फेब्रुवारी रोजी पहाटे २ वाजण्याचे सुमारास कृष्णा याचा मृतदेह रेल्वे पटरीवर मिळून आला. शरद जाधव व त्याच्या सोबत असलेल्या इसमाने दिलेल्या त्रासाला कंटाळुनच कृष्णा काळे यांनी रेल्वे पटरीवर जाऊन आत्महत्या केली अशी तक्रार कृष्णाचा मामेभाऊ सुनील राजेश कुऱ्हाडे (रा. शिवाजीनगर, केडगाव) यांनी दिल्याने शरद जाधव व एक अनोळखी यांच्याविरुध्द कोतवाली पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक प्रविण पाटील हे करीत आहेत.

# २२ लाख रुपयासह कार नेवून मित्रानेच केला व्यावसायिकाचा विश्वासघात

नगर - पैशाची गरज आहे असे सांगून व्यावसायिक असलेल्या मित्राकडून २२ लाख रुपये उसने घेऊन त्याचा विश्वास संपादन करून बाहेरगावी जाण्याकरिता त्याची कार घेऊन गेलेला मित्राने पैसे व कार परत न देता विश्वासघात केल्याची नगरमध्ये उघडकीस आली आहे. या प्रकरणी एकावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कृतार्थ किशोर गुणवरे (वय १९, रा. कॉटेज कॉर्नर, सावेडी) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी गुणवरे याचा मित्र स्वप्नील विजय खाडे (रा. भिस्तबाग चौक, अ.नगर ) याने पैशाची गरज आहे असे सांगून जुलै २०२४ पासून ते २० जानेवारी २०२५ दरम्यान कृतार्थ यांच्या कडून आणि त्याचे आजोबांच्या अकाउंटवरून ऑनलाईन असे हातउसने २२ लाख रुपये घेतले. तसेच २२ जानेवारी रोजी स्वप्निल याने मला बाहेरगावी जावून पैसे घेऊन यायचे आहे. त्याकरिता तुझी जीप कंपनीची कार दे, दोन दिवसाने परत आलो की तुझे घेतलेले २२ लाख रुपये व कार परत देतो असे सांगून विश्वास संपादन करून कृतार्थ गुणवरे याची कार (क्र. एम एच १६ सीई ५०५५) घेऊन गेला. तो अद्याप परतला नाही. त्यानंतर २८ जानेवारी रोजी कृतार्थ हा त्याच्या मित्रांसह स्वप्निल खाडे यांच्या घरी कार व पैसे मागण्या करता गेला असता स्वप्नील खाडे याने त्यांना शिवीगाळ करून गाडी परत मागण्या करता आल्यास हात पाय तोडून घरी पाठवीन अशी धमकी दिली.

त्यामुळे कृतार्थ गुणवरे याने स्वप्निल खाडे यांच्या विरुद्ध धमकी दिल्याची तक्रार दिली होती. त्यावरून पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली. परंतु अद्यापही राहुल खाडे याने पैसे व कार माघारी न दिल्याने कृतार्थ गुणवरे यांनी ६ फेब्रुवारीला सायंकाळी तोफखाना पोलिस ठाण्यात विश्वासघाताची फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी राहुल खाडे यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१६ (२) अन्वये विश्वासघात केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

## घरासमोरून मोपेडची चोरी

नगर - घरासमोर लावलेली सुझुकी कंपनीची मोपेड कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना भिंगार येथील आलमगीर, कवडे नगर येथे घडली.

याप्रकरणी शाकीर लियाकत शेख (वय ३१, रा. कवडे शाळेजवळ कवडे नगर, आलमगीर, भिंगार) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार बी. एन. म्हस्के करीत आहेत.

# पाईपलाईन रोड येथील घरातून चोरी; सोन्या, चांदीच्या दागिने केले लंपास

### अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - बंद घरामध्ये कोणीतरी अज्ञात चोरट्याने प्रवेश करुन घरातील बेडरुम मधील कपाटामध्ये ठेवलेले रोख रक्कम व सोन्याचे चांदीचे दागिने असा ऐवज चोरून नेल्याची घटना पाईपलाईन रोडवरील भारत गॅस गोडाऊन समोर, बरबडे वस्ती येथे ३ फेब्रुवारीच्या सकाळी ११ ते ४ फेब्रुवारीच्या सकाळी ८.३० वाजण्याच्या कालावधीत घडली. तुषार मोहन सापते (वय २३ वर्ष, रा.भारत गॅस गोडाऊन समोर, बरबडे वस्ती, पाईपलाईन रोड, अ.नगर) हे गावाकडे शेतीचे काम असल्याने ३ फेब्रुवारी रोजी कुटुंबासह बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील केळसांगवी येथे गेले होते. दुसऱ्या दिवशी त्यांना त्यांच्या शेजारी राहणारा त्यांचा चुलत भाऊ गौतम सापते याने फोन करून सांगितले की तुमच्या घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा व कुलुप लावलेले आहे. परंतु दरवाजा उघडा आहे. व घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले आहे.

त्यामुळे सापते ताबडतोब नगरला परत आले. त्यांनी येऊन घराची पाहणी केली असता घरातील सामान कोणीतरी उचकापाचक करून सामान अस्ताव्यस्त फेकल्याचे दिसून आले. बेडरूम मधील कपाटाचे लॉकर ही उघडलेले होते. लोखंडी कपाटामध्ये लॉकरमध्ये ठेवलेले २० हजार रुपये, अर्धा ग्रॅम वजनाचे सोन्याचे मनी, एक हजार रुपये किमतीचा चांदीचा कमरपट्टा असा ऐवज मिळुन आले नाही. तेव्हा त्यांची खात्री झाली की, घरामध्ये चोरी झालेली आहे. याप्रकरणी तुषार सापते यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## केडगाव येथून मोटारसायकलची चोरी

नगर - केडगाव उपनगरातील शाहूनगर येथील खाटीक मळा येथे रस्त्याच्या कडेला लावलेली मोटारसायकल (क्र. एम एच १७ ए बी २९६८) कोणीतरी अज्ञात चोरट्याने नजर चुकवून चोरून नेली.

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी संपत बबन उरमुडे (वय ४२, रा. भोयरे पठार, ता.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली. पुढील तपास पोलीस हवालदार संतोष बनकर करीत आहे.

# लोकशाही शुद्धीकरणासाठी उन्नत चेतना, सार्वजनिक नीतिमत्ता संवर्धन अनिवार्य

### लोकाभिमुख, पारदर्शी आणि जबाबदार शासन हेच खरी लोकशाही

नगर - लोकशाही ही जनतेच्या सशक्त सहभागावर आधारित शासनप्रणाली आहे. परंतु, जर लोकशाहीतील नेते आणि नागरिक उच्च नैतिक मूलभूत तत्त्वांवर कार्य करत नसतील, तर ती भ्रष्टाचार, स्वार्थ, आणि नैतिक ऱ्हासाच्या गर्तेत सापडते. यामुळे समाजातील न्याय, समता आणि पारदर्शकता धोक्यात येतात. म्हणूनच, उन्नत चेतना आणि सार्वजनिक नीतिमत्ता संवर्धन ही लोकशाही स्वच्छतेसाठी अनिवार्य घटक असल्याचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी सांगितले आहे.

लोकशाहीतील समस्यांचे मूळ कारण-सध्या लोकशाहीमध्ये भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, आणि राजकीय स्वार्थ मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. सिगमंड फ्रॉइड यांच्या मानसशास्त्रीय संकल्पनेनुसार, म्हणजे मूलभूत स्वार्थी प्रेरणा लोकशाहीत हावी झाल्यास समाजात अनैतिकता आणि स्वार्थ प्रबळ होतो. याचे मुख्य कारण म्हणजे उच्च नैतिक मूल्यांची अनुपस्थिती आणि उन्नत चेतनेचा अभाव असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या समस्येची तुलना आपण पर्यावरणीय संतुलन आणि पाण्याच्या संवर्धनाशी करू शकतो. जसे भूमिगत आर्द्रतेचा ऱ्हास झाला, तर जमीन ओसाड बनते, तसेच सार्वजनिक नीतिमत्तेचा ऱ्हास झाला, तर लोकशाही कमकुवत होते. त्यामुळे लोकशाही शुद्धीकरणासाठी नैतिक नीतिमत्ता पुनर्संचयित करणे आणि उन्नत चेतना वाढवणे आवश्यक आहे.

उन्नत चेतना म्हणजे काय? या संदर्भात स्पष्टीकरण करताना ॲड.गवळी म्हणतात -उन्नत चेतना म्हणजे वैज्ञानिक, तात्त्विक, नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीची जोड असलेली सम्यक विचारशक्ती. ज्या समाजात नागरिक आणि नेते स्वतःच्या स्वार्थाच्या पुढे जाऊन समष्टिगत विचार करतात, तिथे लोकशाही मजबूत होत असल्याचेही ॲड. गवळी यांनी म्हंटले आहे.

स्वतःच्या अहंकारावर विजय मिळवणे सत्ता आणि पैशासाठी अंध असलेल्या नेत्यांऐवजी समाजासाठी कार्य करणारे नेतृत्व आवश्यक आहे. समाजाच्या भल्यासाठी कार्य करणे निर्णय घेतेवेळी केवळ वैयक्तिक फायदा पाहण्याऐवजी लोककल्याणाचा विचार केला पाहिजे. ज्ञानभक्ती, कर्मभक्ती आणि लोकभक्ती योग्य ज्ञानाचा अभ्यास, निःस्वार्थ कृती आणि लोकांप्रती समर्पण ही उन्नत चेतनेची त्रिसूत्री असल्याचे पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. लोकशाही टिकवण्यासाठी सामाजिक आणि राजकीय जीवनात नीतिमत्ता बाळगणे आवश्यक आहे. ही नीतिमत्ता केवळ वैयक्तिक पातळीवर न राहता ती सार्वजनिक जीवनात रूजवणे आवश्यक आहे. निवडणूक प्रक्रियेपासून ते प्रशासनातील निर्णयांपर्यंत सर्व काही पारदर्शक असावे. नागरिकांची जागरूकता: लोकांनी केवळ निवडणुका येतील तेव्हाच नव्हे, तर सतत आपल्या नेत्यांना उत्तरदायी ठेवले पाहिजे. नैतिक शिक्षण: शालेय आणि उच्च शिक्षणात नैतिक आणि समष्टीवादी विचारांचा अंतर्भाव करणे आवश्यक आहे. न्यायसंस्था आणि प्रशासनातील नीतिमत्ता: कायद्याची अंमलबजावणी निःपक्षपाती आणि न्याय्य असावे. लोकाभिमुख, पारदर्शी आणि जबाबदार शासन हेच खरी लोकशाही सिद्ध करू शकत असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

# विठोबा ठोंबरे यांचे आकस्मिक निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी विठोबा बाबाजी ठोंबरे (वय ८८) यांचे ७ जानेवारी रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पाटबंधारे कर्मचारी सोसायटीचे माजी चेअरमन सर्जेराव ठोंबरे व गावातील राजेंद्र ठोंबरे यांचे ते वडील होत.



बडीसाजन ओसवाल श्री संघाच्या 'सॉलीटियर' या सांस्कृतिक भवनाचे उद्घाटन करताना आ.संग्राम जगताप व माजी आमदार अरुण जगताप.

# स्वर्गीय विलास लोढा यांनी रोवलेल्या पायावर अध्यक्ष पेमराज बोथरा व त्यांच्या सहकाऱ्यांनी कळस चढवला

### आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन, बडीसाजन श्री संघाच्या 'सॉलीटियर' सांस्कृतिक भवनाचे उद्घाटन

नगर – बडीसाजन समाजाचे बऱ्याच वर्षांपासूनचे स्वप्न सॉलीटियर या नवीन सांस्कृतिक भवनाच्या माध्यमातून पूर्ण झाले आहे. या वास्तूचा स्व.विलास लोढा यांनी जो पाया रोवला त्यावर पेमराज बोथरा व त्यांच्या सहकाऱ्यांनी कळस चढवला आहे. समजाचे आपण देणं लागतो या भावनेने बोथरा परिवार दातृत्वाची भूमिका बजावत समाजाचे उत्कृष्ट नेतृत्वही करत आहेत. या सांस्कृतिक भवनाच्या उभारणीसाठी समजतील प्रत्येक लहान मोठ्या, गरीब, श्रीमंत व्यक्तीचा हातभार लागला असल्याने प्रत्येकाची नाळ व भावना या वास्तूशी जोडली गेली आहे, हेच या भव्य सांस्कृतिक भवनाचे वैभव आहे. जशी आचार्य आनंदऋषीजी महाराजांमुळे नगरची ओळख पूर्ण भारतभर निर्माण झाली आहे, तशीच बडीसाजन संघाच्या माध्यमातून अधिकाधिक समाजाभिमुख कामे करून अहिल्यानगरची वेगळी ओळख पूर्ण भारतभर निर्माण करण्यासाठी आता थांबू नका. बडीसाजन परिवार व जगताप परिवाराचे फार जुने ऋणानुबंध आहे, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.

बडीसाजन ओसवाल श्री संघाच्या 'सॉलीटियर' या नवीन सांस्कृतिक भवनाचे उद्घाटन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते व माजी आ. अरुण जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत एका सुंदर सोहळ्यात झाले. संस्थेचे अध्यक्ष प्रेमराज बोथरा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास उपाध्यक्ष अजित कर्नावट, सेक्रेटरी विशाल शेटिया, सहसेक्रेटरी अनिल लुंकड, खजिनदार मिलिंद जांगडा व सहखजिनदार दीपक बोथरा आदींसह सर्व संचालक उपस्थित होते. यावेळी दीपप्रज्वलन झाले.

अजित कर्नावट यांनी 'सॉलीटियर' या वास्तूच्या उभारणीची पार्श्वभूमी व घटनाक्रम सांगून समाजातील सर्व स्तरातील नागरिकांचा यासाठी मोलाचा हातभार लागला आहे. यात बोथरा परिवाराचेही मोठे योगदान असल्याचे सांगितले.

सॉलीटियर सांस्कृतिक भवनाच्या उभारणीत बोथरा परिवाराच्या योगदानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष पेमराज बोथरा यांचा माजी आमदार अरुण जगताप यांनी पुणेरी पगडी घालून सपत्नीक सत्कार केला. तसेच देणगीदार संतोष बोथरा, संपत बाफना, अशोक पारख, अरुण दुगड, डॉ.प्रकाश कांकरिया, सतीश बोथरा, सुजाता लोढा, संजय ताथेड, वसंत शेटिया यांच्यासह समाजातील विविध क्षेत्रातील नागरिकांचाही सन्मान बडीसाजनच्या वतीने यावेळी करण्यात आला.

प्रास्ताविकात सुमतीलाल कोठारी म्हणाले, स्व.विलास लोढा यांच्या प्रेरणेने व विद्यमान अध्यक्ष पेमराज बोथरा यांच्या मार्गदर्शनाखाली सॉलीटियर हे भव्य सांस्कृतिक भवन उभारले आहे. संस्थेच्या सर्व संचालकांनी समाजातील नागरिकांच्या घरोघर जाऊन या वास्तूच्या उभारणीसाठी निधी संकलन केले. या भवनात अद्यावत ६० रूम व ४ लक्झुरिअस सूट असून ३०० नागरिकांची निवासाची सोय येथे आहे.

तसेच भव्य हॉलमध्ये ७०० नागरीकांची आसन व्यवस्था होणार आहे. पेमराज बोथरा यांनी अत्यंत बारकाईने या वस्तूच्या उभारणीत लक्ष घालून खूप आकर्षक रूप दिले आहे.

यावेळी अनिल कोठारी, ॲड.अशोक कोठारी, सिए किरण भंडारी आदींनी मनोगत व्यक्त केले.

समृद्धी शेटिया यांनी सूत्रसंचालन केले तर अनिल लुंकड यांनी आभार मानले.

यावेळी बडीसाजन ओसवाल संघाचे कार्यकारणी सदस्य पोपटलाल कटारिया, धरमचंद कोठारी, राजेंद्र बोथरा, नरेंद्र चोरडिया, पोपट लोढा, राजेंद्र ताथेड, नरेंद्र बाफना, मनोज शेटिया, अनिल दुग्गड, दिनेश शिंगवी, सुशील भंडारी, तज्ञ सल्लागार सीए मोहन बरमेचा व ॲड. अशोक कोठारी आदींसह नागरिक उपस्थित होते.

# महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी ८ फेब्रुवारीपासून विविध क्रीडा स्पर्धा

### शनिवारी सकाळी क्रिकेट स्पर्धेने होणार शुभारंभ

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्यावतीने आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून कर्मचाऱ्यांसाठी पुढील १५ दिवस क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन वाडिया पार्क क्रीडा संकुलात व माऊली सांस्कृतिक सभागृहात करण्यात आले आहे. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन यशवंत डांगे यांच्या हस्ते होणार आहे. स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांसाठी ६ गटात व ६ संघात ही स्पर्धा होणार आहे. १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता माऊली सांस्कृतिक सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर, २ मार्च रोजी स्पर्धांचे पारितोषिक वितरण पार पडणार आहे.

कर्मचाऱ्यांसाठी आयोजित स्पर्धा प्रशासकीय इमारत, प्रभाग समिती क्रमांक १, प्रभाग समिती क्रमांक २, प्रभाग समिती क्रमांक ३, प्रभाग समिती क्रमांक ४ व शिक्षण विभाग अशा सहा संघांमध्ये होणार आहे. यात मैदानी स्पर्धा, कबड्डी, बॅटमिंटन, बुद्धीबळ, कॅरम, क्रिकेट आदी स्पर्धा होणार आहेत. मैदानी स्पर्धेत १०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे, जलद चालणे, गोळा फेक, ४ x १०० रिले आदी स्पर्धा होणार आहेत. स्त्री व पुरुषांसाठी १८ ते ३० वर्षे, ३० वर्षांवरील ते ४० वर्षापर्यंत, ४० वर्षावरील ते ४५ वर्षापर्यंत, ४५ वर्षावरील ते ५० वर्षापर्यंत, ५० वरील ते ५५ वर्षापर्यंत व ५५ वर्षावरील ते ६० वर्षापर्यंत अशा सहा गटात या सर्व स्पर्धा होणार आहेत.

यावेळी उपायुक्त विजयकुमार मुंडे, संतोष टेंगळे, प्रियंका शिंदे, मुख्य लेखापरीक्षक विशाल पवार, मुख्य लेखा अधिकारी सचिन धस, सहाय्यक आयुक्त सपना वसावा आदींसह सर्व विभाग प्रमुख, प्रभाग अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. माऊली सभागृहात होणार सांस्कृतिक कार्यक्रम सर्व कर्मचाऱ्यांसाठी पार पडणार आहे. यात कर्मचारीही सहभागी होणार आहेत.

२ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता जिल्हा क्रीडा संकुल वाडीया पार्क येथे स्पर्धांचे पारितोषिक वितरण होणार आहे.



महाराष्ट्र राज्य शब्दगंध साहित्य संमेलन ८ व ९ फेब्रुवारी रोजी सावेडी येथील कोहिनूर मंगल कार्यालयामध्ये होत असून त्याच्या उद्घाटनाचे निमंत्रण पद्मश्री पोपटराव पवार यांना देताना स्वागत अध्यक्ष संपत बारस्कर, शब्दगंध साहित्य परिषदेचे संस्थापक सुनील गोसावी, अध्यक्ष राजेंद्र उदागे, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, राजेंद्र चोभे आदी उपस्थित होते.

# कथाकथन स्पर्धेत हिंदवी शिंदे द्वितीय



नगर – हिंद सेवा मंडळाची दादा चौधरी मराठी शाळेतर्फे अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत शहर व जिल्हास्तरातील सुमारे ७९ शाळेतील १९५० विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत भाग घेतला होता.

बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील विद्यार्थीनींनी हिंदवी शिंदे या विद्यार्थिनीने कथाकथन स्पर्धेत मोठ्या गटात द्वितीय क्रमांक मिळवला. हिंदवी हिने गुरूंची शिकवण ही बोधकथा सादर केली तिचे सादरीकरण, पाठांतर अत्यंत उत्कृष्ट होते त्यामुळेच तिला द्वितीय क्रमांक दिल्याचे परीक्षकांनी सांगितले.

हिंदवीला तिचे वडील प्रसाद शिंदे, आई भाग्यश्री शिंदे तसेच इचरजबाई प्रशालेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. हिंदवी ही स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांची कन्या आहे.

# रक्तदान चळवळीतील सक्रीय योगदानाबद्दल पैं. नाना डोंगरे सन्मानित

नगर – ग्रामीण भागात रक्तदान चळवळीला गती देऊन सामाजिक संघटनेच्या माध्यमातून रक्तदान घडवून आणल्याबद्दल नालेगाव येथील जनकल्याण रक्त केंद्राच्या वतीने श्री नवनाथ युवा मंडळ व स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेचा सन्मान करण्यात आला.



रक्तदान चळवळीतील सक्रीय योगदानाबद्दल पै. नाना डोंगरे यांचा सन्मान करण्यात आला.

रक्त केंद्राच्या वतीने वर्षभर विविध जयंती, उत्सवात रक्तदान शिबिर घेणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात आला. यावेळी नवनाथ युवा मंडळ व डोंगरे संस्थेच्या वतीने पै. नाना डोंगरे यांनी सन्मान स्विकारला. यावेळी जनकल्याण रक्त केंद्राचे अध्यक्ष अभय मेस्त्री, कार्यवाहक संतोष इंदानी, जयदेवसिंग, पंकज यादव, डॉ. दिलीप वाणी, मुकुल पाटगावर, चंदन कटारिया, कपील धुमाळ, वाल्मिक कुलकर्णी, डॉ. विलास मढीकर, रुपेश भंडारी, पंकज शहा, सागर उंडे, सिता बडवे, शरद बळे, सोनाली खांडरे, डॉ. रुपाली म्हसे, अनिल धोकरीया आदी उपस्थित होते.

श्री नवनाथ युवा मंडळ व स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून संस्थेचे अध्यक्ष संदिप डोंगरे व पै. नाना डोंगरे मागील १५ वर्षापासून निमगाव वाघा (ता. नगर) येथे रक्तदान शिबिर आयोजित करत आहे. दरवर्षी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती आणि राष्ट्रीय युवा सप्ताहानिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात येते.

सातत्याने संस्थेच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे उपक्रम सुरु असून, या कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आहे.




अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या प्रांगणात युवान व राष्ट्रीय युवा योजनेच्या राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक युवा शिबिरात सहभागी झालेल्या युवक-युवतींनी सांस्कृतिक कार्यक्रमातून अखंड भारताचे दर्शन घडविले

# भाऊसाहेब फिरोदियात विविध प्रांतातून आलेल्या युवक - युवतींनी घडविले अखंड भारताचे दर्शन

### सांस्कृतिक कार्यक्रमातून विविध राज्यातील भाषा, पेहराव व संस्कृतीने भारावले नगरकर

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या प्रांगणात युवान व राष्ट्रीय युवा योजनेच्या राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक युवा शिबिरात सहभागी झालेल्या युवक-युवतींनी सांस्कृतिक कार्यक्रमातून अखंड भारताचे दर्शन घडविले. विविध प्रांतातून आलेल्या युवकांनी सामाजिक व धार्मिक ऐक्याचा संदेश देऊन विविधतेने नटलेल्या भारतातील विविध संस्कृती व भाषेने लक्ष वेधले. या कार्यक्रमात २७ राज्यातून आलेले ३५० युवक-युवतींसह शालेय विद्यार्थी सहभागी झाले होते.

भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या मोने कला मंदिरात अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने या सांस्कृतिक कार्यची सुरुवात झाली. अहमदनगर सह कार्यवाह गौरव फिरोदिया, संस्थेचे सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी, युवानचे कार्यकर्ते रणसिंग परमार, करयाल सुकुमारन, मधुसूदन दास, नरेंद्र वडगावकर, रजनी इजॉईस, हेमंत लोहगावकर, संदीप कुसळकर, सुरेश मैड, ॲड. श्याम असावा आदींसह युवा शिबिराचे सर्व निमंत्रक, विविध शाळांचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, अध्यापक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संदीप कुसळकर यांनी देशात जात, धर्म व भाषा वरुन वाद उफाळला असताना राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश घेऊन संपूर्ण देशातील युवक-युवती या सात दिवसीय राष्ट्रीय एकात्मता शिबिरात सहभागी झाले आहेत. यामधील शिबार्थी भाषा, संस्कृती व विचारांची देवाण-घेवाण करत असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व धर्म प्रार्थना घेण्यात आली. सर्व घटक राज्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रादेशिक भाषेतून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. तर देश की ताकद नौजवान..., भाईजी की कामना, सद्भावना सद्भावना..., जोडो जोडो भारत जोडे.... या घोषणांनी परिसर दणाणला.


छायाताई फिरोदिया यांनी विविध प्रांतातून आलेल्या युवक युवतींनी राष्ट्रीय एकात्मतेच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. आंध्रा, आसाम, हरियाणा, गुजरात, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, केरळ, झारखंड आदी राज्यातून आलेल्या युवक-युवतींनी त्यांच्या प्रांतातील भाषा, पेहराव व संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले.

या कार्यक्रमातून शिबिरार्थींनी सर्व धर्माचा आदर, सन्मान करून भारत एक संघ ठेवणे व विविधतेतून एकात्मतेचा संदेश दिला. कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास दुगड, रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक अजय बारगळ, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, भिंगार हायस्कूलचे मुख्याध्यापक रावसाहेब कासार यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन नीलिमा शिंदे यांनी केले. आभार गीतांजली भावे यांनी मानले.

# 'पिकल बॉल' आता परदेशाबरोबर भारतातही लोकप्रिय आणि प्रचलीत

### जयंतराव पवार यांचे प्रतिपादन; पुणे येथील विमाननगर येथे बॉलक्रीडांगणाचे उद्घाटन





विमाननगर येथे पिकल बॉल या क्रीडांगणाचे उद्घाटन क्लबचे संचालक जयंतराव पवार यांचे हस्ते फित कापून व दिप प्रज्वलन करून करण्यात आले.

पुणे – पिकल बॉल हा खेळ आता परदेशाबरोबर भारतात ही लोकप्रिय व प्रचलीत होत आहे, असे प्रतिपादन संचालक जयंतराव पवार यांनी केले.

विमाननगर येथे पिकल बॉल या क्रीडांगणाचे उद्घाटन क्लबचे संचालक जयंतराव पवार यांचे हस्ते फित कापून व दिप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहूणे ध्यानंचद ॲवार्ड विजेते आंतरराष्ट्रीय टेनिस खेळाडू नितीन किर्तने यांच्या हस्ते या क्रीडांगणाची पुजा करून नारळ वाढवून हे क्रीडांगण खेळण्यासाठी उपलब्ध झाल्याचे जाहीर केले.

पिकल बॉल क्रीडांगणाची निर्मिती इंजि. राहुल पवार, सौ.पुनम पवार, देवयानी पवार व अहिल्यानगर येथील आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू यश शाह यांच्या प्रयत्नातून व पुढाकाराने उभारण्यात आली. असुन शुभारंभा प्रसंगी फिटनेस कोच मिहीर तेरणीकर, राजा पवार, चैतन्य (दादा) नाईक, खेळाडु व मित्र परिवार उपस्थित होते.

पुण्यातील विमाननगर (म्हाडा कॉलनी) येथील स्पोर्टस कॉम्लेक्स येथे नव्याने निर्मिती केलेली चार क्रीडांगणे ही (डांबरयुक्त) अद्ययावत्व, तांत्रिकशुध्द पध्दतीने बनविलेली असून खेळाडुंना ईजा होण्यापासुन वाचवतील व सर्वाच्या पसंतीस निश्चितच उतरतील, असे जयंतराव पवार यांनी शुभेच्छा देऊन पुढे बोलताना पवार म्हणाले पुणे हे विद्येचे माहेरघर आहे तसेच खेळांचे ही प्रथितयश क्षेत्र आहे, नव्याने निर्मित केलली क्रीडांगण आकर्षक रंगसंगती, हवेशीर, आकर्षक व सर्व सेवा-सुविधाजन्य पुरक असून खेळाडुंच्या उच्च प्रगतीसाठी भविष्यात उच्च असे मानबिंदु ठरतील. अशी आशा व्यक्त केली. तरी या क्रिडांगणाचा खेळाडुंनी भरपुर फायदा घ्यावा असे आवाहन सोलारिस (पुणे) क्लबचे संचालक जयंतराव पवार यांनी केले.

नितिन किर्तने म्हणाले, १९६५ मध्ये वॉशिंग्टन येथे बीलबेन, मॅकलबिन, जो पिचर्ड या तिन मित्रांनी या खेळाचा-शोध लावला असून आंतर व बाह्य अशा क्रिडांगणात हा खेळ खेळता येतो. या खेळामुळे सर्वांचा सुंदर व्यायाम होत असल्याने सर्व वयोगटातील खेळाडू हा खेळ खेळू शकतात. व आनंद घेतात. ही नवनिर्मित क्रीडांगणावर आंतरराष्ट्रीय पातळीच्या स्पर्धा देखील घेता येतील. संचालक राहुल पवार यांनी आभार मानले.

# नैतिक मूल्यांची चौफेर घसरण होत असताना ज्ञानेश्वरीच मार्ग दाखविल : ॲड. अभय आगरकर

### श्री ज्ञानेश्वरी अभ्यास पथदर्शी आणि ज्ञानेश्वरीतील साहित्य विचारी ग्रंथांचे प्रकाशन

नगर – संत ज्ञानेश्वर माऊली सप्त शतकोत्तर स्वर्ण महोत्सव जन्म जयंती महापर्वात आयोजित श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग सामूहिक चिंतन महाप्रकल्प ही नगर शहरात घडणारी ऐतिहासिक घटना आहे. अध्यात्मिक चळवळ यातून उभी होते. या चळवळीत डॉक्टर, वकील, प्राध्यापक, इंजिनिअर, आयटी सेक्टर मधील लोक, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते असे विविध क्षेत्रातील लोक एकत्र चिंतन करीत आहेत. ही गोष्ट पुढील पिढ्यांसाठी अतिशय आशादायी आहे. आनंद विद्यालयातील एका वर्गात घडणार्या या अभ्यासासाठी एक स्वतंत्र अध्यात्मिक केंद्र उभे करण्याची जबाबदारी मी घेतो. आपण यासाठी भव्य वास्तू उभारू. संत साहित्याचे अभ्यासक डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी आचार्य पदावरून चांगले मार्गदर्शन केले आहे. त्यामुळे या अभ्यास वर्गाचे रूपांतर आध्यात्मिक चळवळीत होऊन नैतिक मूल्यांची चौफेर घसरण होत असताना ज्ञानेश्वरीच मार्ग दाखविल, असे विचार श्री विशाल गणपती ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी व्यक्त केले.

संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या सप्त शतकोत्तर जन्म जयंतीनिमित्त गेल्या अनेक महिन्यांपासून आनंद विद्यालयात सुरु असलेल्या श्री ज्ञानेश्वरी पाठ्यग्रंथ वाचन व निरूपण वर्गाची सांगता करण्यात आली. यावेळी अभय आगरकर बोलत होते. यावेळी चार्टर्ड अकाउंटंट राजेंद्र काळे, ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गाचे संयोजक डॉ. दिलीप धनेश्वर, डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे यांच्यासह सहभागी साधक उपस्थित होते.



श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गाच्या समारोपानिमित्त श्री ज्ञानेश्वरी अभ्यास पथदर्शी आणि ज्ञानेश्वरीतील साहित्य विचारी या ग्रंथांचे प्रकाशन करतांना ॲड. अभय आगरकर. समवेत डॉ.दिलीप धनेश्वर, सी.ए.राजेंद्र काळे, साहित्यिक डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे, सौ.उषा सहस्त्रबुद्धे आदी.

या निमित्त आयोजित कार्यक्रमात श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गातील साधकांना उपयुक्त ठरलेल्या टिपणींच्या 'श्री ज्ञानेश्वरी अभ्यास पथदर्शी' या ग्रंथाचे प्रकाशन व प्राचार्य अनिल सहस्त्रबुद्धे लिखित 'श्री ज्ञानेश्वरीतील साहित्य विचार' या ग्रंथाच्या तृतीय आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. हे दोन्ही ग्रंथ अभ्यासाकांना प्रसाद म्हणून यावेळी देण्यात आले. त्याचबरोबर अभ्यासक व तज्ञांच्या निबंधाच्या आधारे श्री ज्ञानेश्वरीचे साहित्य, सुसंस्कृत समाज कुटुंब व राज्य व्यवस्था, सर्वधर्म विचार आदी सर्वांगीण दृष्टीने श्री ज्ञानेश्वरी चिंतन असा ग्रंथ साकारण्याचा संकल्प करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी सामूहिक चिंतन प्रकल्पाचा इतिहास कथन करून या चिंतन प्रकल्पाचे महत्त्व विषद केले. दत्तात्रय भालेराव यांनी अभ्यास वर्गाची भूमिका मांडली. डॉ. दिलीप धनेश्वर यांनी स्वागत करून या अभिनव उपक्रमामध्ये तरुणांनी तसेच नगरकरांनी सहभागी होण्याचे आवाहन केले.


सौ.उषा सहस्त्रबुद्धे यांनी सूत्रसंचालन केले. प्रवरा परिक्रमा यशस्वी केल्याबद्दल संजय खेले, प्रा. सुदाम देवखिळे यांचा गौरव करण्यात आला. सौ. सुजाता नरसाळे यांनी आरती आणि पसायदान म्हंटले. प्रा. डॉ.राजू रिक्कल यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. श्रीनिवास आपटे यांनी आभार मानले.

विहा पब्लिकेशनचे प्रकाशक श्रीपाद कुलकर्णी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# भारत हे माझे आध्यात्मिक घर, या भूमीच्या ऊर्जेमध्ये मला पूर्ण विसर्जित करायचे आहे

## वेरोनिका डीमीट्रावा यांचे प्रतिपादन; बल्गेरिया, अर्हम पुरुषाकार ट्रेनर व पहिली जागतिक राजदूत

नगर – गुरु आनंद तिर्थ चिचोंडी येथे जानेवारी २०२५ मध्ये अर्हम पुरुषाकार मेडिटेशन या अर्हम विज्ञा फाउंडेशनच्या एका अत्यंत प्रभावशाली कोर्सचा प्रमाणपत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम झाला. यामध्ये ६ महिने प्रशिक्षक घेणाऱ्या साधकाला ७२ तासांचे ध्यान सत्र करून नंतर प्रमाणपत्र दिले जाते. यंदा या कोर्समध्ये बल्गेरियाची फॅशन मॉडेल असणारी वेरोनिका डीमीट्रोवा या प्रशिक्षणात सामील झाली होती स्वतःला या ७२ तासांच्या साधनेत पूर्णपणे समर्पित करणाऱ्या वेरोनिकाने यापुढेही एक अर्हम पुरुषाकार मेडिटेशनची पहिली जागतिक राजदूत या नात्याने बल्गेरिया व भारताबाहेरील देशात या ध्यान पद्धतीचा प्रसार करण्याचा निर्धार केलेला आहे एकंदरीत तिची ही यात्रा एका मुलाखतीद्वारे तिने स्पष्ट केली



अर्हम पुरुषाकार मेडिटेशन या अर्हम विज्ञा फाउंडेशनच्या कोर्सचा प्रमाणपत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम झाला.

**१. अर्हम पुरुषाकर मेडिटेशन (APM) सह तुमचा प्रवास कसा सुरू झाला? या ध्यान पद्धतीबद्दल तुम्ही प्रथम कसे शिकलात?**

अर्हम पुरुषाकार मेडिटेशन (APM) सह माझा प्रवास माझ्या व्यापक आध्यात्मिक शोधाचा एक भाग म्हणून सुरू झाला, माझ्या भारतातील वास्तव्याचा माझा जीवनावर खोलवर प्रभाव पडला. जून २०२४ मध्ये, मी योगाचा अभ्यास करण्यासाठी गोव्याला गेले आणि माझ्या सरावाला आकार देणाऱ्या अतुलनीय शिक्षकांच्या शिकवणीत मग्न झाले

माझ्या वास्तव्या दरम्यान, माझे एक शिक्षक, मुना, दररोज गुरुदेव आणि त्यांच्या उर्जेबद्दल सांगायचे. मला त्यांच्या एका कार्यक्रमात सामील होण्याची तात्काळ तीव्र इच्छा झाली. मात्र, त्यावेळी त्याने मला सांगितले की, त्यांचे कार्यक्रम फक्त हिंदीत होतात – ती भाषा मी बोलत नाही. तरीही, मला विश्वास होता की जर हा मार्ग माझ्यासाठी असेल तर संधी नक्की मिळेल.

आणि मग, तेच झाले. एके दिवशी, मुना हसत हसत माझ्याकडे आला आणि म्हणाला: तुझी इच्छा सत्यात उतरली.... त्यांनी नुकताच एक इंग्रजी कार्यक्रम उघडला आहे! त्या क्षणी, मला माहित होते की हे होणारच होते. माझा अर्हम पुरुषाकार ध्यानाचा प्रवास तर आधीच सुरू झाला होता – मी अधिकृतपणे सराव सुरू करण्यापूर्वीच.

**२. व्यवसायाने मॉडेल/अभिनेत्री असूनही आध्यात्मिक प्रवास सुरू करण्यासाठी तुम्हाला कशामुळे प्रेरणा मिळाली?**

अध्यात्म माझ्या जीवनापासून कधीच वेगळे नव्हते– ते नेहमीच एक गुप्त मनोभावात होते, पूर्णपणे स्वीकारण्याची वाट पाहत होते.

एक मॉडेल म्हणून, मला प्रवास करण्याची आणि जगातील विरोधाभास पाहण्याची संधी मिळाली, परंतु आणखी काहीतरी मला नेहमी हाक देत होते. २०२१ मध्ये माझ्या भारताच्या पहिल्या प्रवासादरम्यान, मी फॅशन उद्योगापेक्षा देशाच्या खोल अध्यात्मिक वारशाकडे अधिक आकर्षित झालेले पाहीले. कोविड कालावधी माझ्यासाठी टर्निंग पॉईट होता... मला अंतरंगात पाहण्यासाठी आणि माझ्या उद्देशावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यासाठी. सौंदर्य केवळ बाह्य नसून ती ऊर्जा, वास्तविकता आणि सत्यता आहे हे सत्य मला खरोखर प्रेरित करणारे होते मॉडेलिंगने मला बाह्य प्रमाणीकरण दिले, परंतु अध्यात्माने मला आंतरिक शांती दिली. तेव्हापासून मला भारत माझे आध्यात्मिक घर वाटते.

**३. तुमचा ६ महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी कसा/कसा होता?**

सहा महिन्यांचा कालावधी आत्म–शिस्त, खोल आंतरिक कार्य आणि परिवर्तन यांचे मिश्रण होते. त्या वेळी मी अनेक गोष्टींचा समतोल साधत होते – माझे योग शिकवणे, माघार घेणे आणि सर्वसमावेशक पद्धती विकसित करणे. पण पुरूषाकार ध्यान प्रशिक्षणाने मला माझ्या सीमेपलीकडे नेले, मला माझे लक्ष सुधारण्यात मदत झाली. कार्यक्रमाच्या संरचनेमुळे मला केवळ एक सराव म्हणून नव्हे तर जीवनाचा एक मार्ग म्हणून ध्यानाचा अनुभव घेता आला. अंतरंग प्रवासाचा च्या प्रत्येक टप्प्यात नवनवीन खुलासे झाले:

अवचेतन मनाची माझी समज वाढवण्यापासून ते ज्ञान, भावना, कृती, वर्तन, नातेसंबंध आणि नियोजनाचा मार्ग आपल्या वास्तवाला कसा आकार देतात हे शिकण्यापर्यंत.

**४. प्रमाणपत्रासाठी भारतात येण्याचा तुमचा निर्णय कशामुळे प्रेरित झाला? ७२ तासांच्या कार्यशाळेत तुमचा अनुभव कसा होता?**

मी आधीच म्हटल्याप्रमाणे, भारत नेहमीच माझे आध्यात्मिक घर आहे, जिथे माझ्या परिवर्तनाची सुरुवात झाली. या प्रमाणपत्रासाठी येणे म्हणजे माझ्या प्रवासातील एक नैसर्गिक क्रमच आहे असे वाटते. मला अशा भूमीच्या उर्जेमध्ये पूर्णपणे विसर्जित करायचे होते जीने माझ्या अध्यात्मिक मार्गाला आकार दिला, विशेषत: कार्यशाळा झालेल्या या शांत आनंद तीर्थावर मला ते अधिक खोलवर जाणवले.

७२ तासांची कार्यशाळा माझ्या आत्तापर्यंत च्याअनुभव पेक्षा वेगळी होती. आम्ही १५० जण होतो....आम्ही संपूर्ण शांततेत ७२ तास सतत ध्यान केले. आम्ही बोललो नाही, एकमेकाना डोळ्यांशी संपर्क साधला नाही, आरशात पाहिले नाही,

आणि आमचा मोबाईलशी ही संपर्क नव्हता. सुरुवातीचा टप्पा आव्हानात्मक होता–बाह्य जगापासून अलीप्त होणे, व अज्ञाताला शरण जाणे–....पण जसजसा काळ सरकत होता तसतशी वास्तविकता आणि सत्यतेची खोल भावना निर्माण झाली.

शिविराच्या शेवटी, मला ते संपवायचे नव्हते. माझ्या आत काहीतरी हालचाल झाली होती; मला एक गहन आंतरिक शांतता आणि उच्च उर्जेशी कनेक्शन जाणवले. गुरुदेवांची उपस्थिती अत्यंत शक्तिशाली होती – त्यांची ऊर्जाच मला उंचावत आहे, मला मार्गदर्शन करत आहे असे मला वाटत होते. त्या क्षणापासून, असे वाटते की जणू काही माझ्यासोबत दररोज चमत्कार घडत आहेत. माझ्या जीवनात प्रवाहाची, गतीची भावना आहे जी पूर्वी नव्हती आणि मला खरोखर धन्यता वाटते.

**५. प्रमाणित APM ट्रेनर म्हणून कसे वाटते? एक प्रशिक्षक म्हणून पुढे जाण्यासाठी तुमच्या आकांक्षा काय आहेत?**

प्रमाणित APM ट्रेनर बनणे हा एक मोठा सन्मान आहे. ही प्रथा शरीरात वास करणाऱ्या आत्म्याला स्फुरण देण्यासाठी तयार केली गेली आहे आणि तीव्रतेने ते प्रत्यक्ष अनुभवल्याने माझी ध्यानाची धारणा कायमची बदलली आहे.

माझ्यासाठी हे आणखी विशेष आहे की हे ज्ञान मिळवणारी मी भारताबाहेरील पहिली परदेशी आहे. ही एक मोठी जबाबदारी वाटते–फक्त त्याचा सराव करणेच नव्हे, तर माझ्या मूळ देश, बल्गेरियापासून ते जगासोबत शेअर करणे.

पुढे जाताना, या ज्ञानाचा सन्मान करणे, सरावाची शुद्धता टिकवून ठेवणे आणि या ध्यानाने माझ्या आयुष्यात आणलेले चमत्कार आणि आशीर्वाद इतरांनाही त्यांच्या आयुष्यात अनुभव करण्यास मदत करणे हे माझे लक्ष्य आहे. मी याला पूर्वेकडील शहाणपण आणि पाश्चात्य साधक यांच्यातील एक बंध म्हणून पाहते, ज्यामुळे लोकांना माझ्यासारखे त्यांचे अंतरंग जागृत करण्यात व स्वतःचे परिवर्तन अनुभवण्यास मदत होईल.



मराठा समन्वय परिषद, विजया लक्ष्मण काळे व हिरकणी ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने सक्षम जिजाऊ–सावित्री अभियानाचा हळदी–कुंकू कार्यक्रमातून प्रारंभ झाला. याप्रसंगी उपस्थित असलेल्या महिला भगिनी.

# सक्षम जिजाऊ–सावित्री अभियानाचे हळदी–कुंकू कार्यक्रमातून प्रारंभ

## मराठा समन्वय परिषद, विजया लक्ष्मण काळे व हिरकणी ग्रुपचा संयुक्त उपक्रम

नगर – मराठा समन्वय परिषद, विजया लक्ष्मण काळे व हिरकणी ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने हळदी–कुंकू कार्यक्रमात सांस्कृतिक व संस्कृतीचा सोहळा रंगला होता. पारंपारिक वेशभूषेत आलेल्या महिलांनी विविध स्पर्धेत सहभाग नोंदवला. महिला सक्षमीकरणासाठी सक्षम जिजाऊ–सावित्री अभियानाचे प्रारंभ करण्यात आले. यावेळी उपस्थित महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या हळदी–कुंकूच्या कार्यक्रमासाठी माही नगरसेविका दिपाली बारस्कर, मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे, प्रयास ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा, डॉ. सुलभा पवार, रजनी भंडारी, राखी, मीनाक्षी जाधव, प्रतिभा भिसे, शोभा भालसिंग, अर्चना बोरुडे, मनिषा जाधव, मिनाक्षी मुनफन, स्वरा मुनफन, आशिष सुपेकर, निष्ठा सुपेकर, अभिलाषा वाघ, आरोही वाघ, भगवती चंदे, सारिका खांदवे, ज्योती भालेकर, शामल भालेकर, नमित भालेकर आदींसह महिला उपस्थित होत्या.

उपस्थित महिलांच्या हस्ते सक्षम जिजाऊ–सावित्री अभियानाच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. यावेळी महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. तर विविध मनोरंजन, कौशल्यात्मक व बौध्दिक स्पर्धेत महिलांनी सहभाग नोंदवला. विजेत्या महिलांना उपस्थितांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. हळदी–कुंकूच्या सेल्फीपॉइंटने सर्व महिलांचे लक्ष वेधले.

अनिता काळे म्हणाल्या की, समाज घडविण्यासाठी महिलांना जिजाऊ व सावित्रीबाई यांच्या विचाराने पुढे जावे लागणार आहे. आपल्या मुला–मुलींमध्ये संस्कार रुजविल्यास सक्षम समाज निर्मिती होणार आहे. कुटुंब सांभाळताना महिलांनी आरोग्याची देखील काळजी राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तर सक्षम जिजाऊ–सावित्री अभियानाच्या माध्यमातून महिलांचे मानसिक, शारीरिक व आरोग्य चांगले राहण्यासाठी विशेष उपक्रम राबवून त्यांच्यात आरोग्याविषयी जागृती केली जाणार आहे. मुलींमध्ये समाजात पुढे जाताना एक आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम केले जाणार आहे. तसेच महिला–मुलींच्या सुरक्षितता व इतर प्रश्नांवर या अभियानाच्या माध्यमातून कार्य केले जाणार असल्याची माहिती काळे यांनी दिली.

# तबला वादन मध्यमा प्रथम परीक्षेत ईशान तुंगार केंद्रात सर्वप्रथम



नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळातर्फे सत्र नोव्हेंबर डिसेंबर २०२४ या सत्रात घेण्यात आलेल्या सांगीतिक परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला असून शिवरंजन संगीतालयाचा ईशान अवधूत तुंगार हा विद्यार्थी तबला वादन हा विषय घेऊन मध्यमा प्रथम परीक्षेत केंद्रात सर्वप्रथम आला. त्याला विद्यालयाचे संचालक सुरज शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. ईशान हा समर्थ प्रशालेचा इयत्ता १० वी चा विद्यार्थी असून, स्वरमंदिर भजनी मंडळाच्या संचालिका सौ. वैजयंती तुंगार तसेच खाजगी शिक्षक संघटनेचे माजी अध्यक्ष के.आर तुंगार सर यांचा तो नातू आणि बाई ईचरजबाई फिरोदिया प्रशालेच्या बालवाडी विभागाच्या शिक्षिका सौ.अर्चना तुंगार यांचा मुलगा आहे.

# शब्दगंध शैक्षणिक कार्यगौरव पुरस्कार शिक्षिका वर्षाताई भोईटे यांना जाहीर



नगर – संतुकनाथ विद्यालय, जेऊर येथील शिक्षिका श्रीमती वर्षा भोईटे यांना शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने दिला जाणारा शब्दगंध शैक्षणिक कार्यगौरव पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. श्रीमती वर्षा भोईटे या २८ वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून विविध शैक्षणिक उपक्रमात त्या अग्रेसर आहेत. स्कॉलरशिप वर्गाला इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन तसेच १० वी च्या विद्यार्थ्यांना दहा वर्षांपासून इंग्रजी विषयाचे अध्यापन त्या करत आहेत. एक तज्ज्ञ मार्गदर्शक आणि एक संवेदनशील कवयित्री म्हणूनही त्या प्रसिद्ध आहेत. ८ व ९ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृती मंडळ व शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने कवयित्री संजिवनी तडेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या १६ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनात वर्षा भोईटे यांना सन्मानपूर्वक हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

शब्दगंधचे संस्थापक सचिव सुनील गोसावी, अध्यक्ष राजेंद्र उदागे, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, गोसावी, स्वाती ठुबे, सुरेखा घोलप यांनी अभिनंदन केले आहे.

# मैदानी खेळ शारीरिक आरोग्य तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी महत्त्वाचे

## प्राचार्या सौ. प्रणिता मेंडसुरे यांचे प्रतिपादन

नगर – मैदानी खेळ हे मानवी जीवनाचा महत्त्वाचा भाग आहेत. मैदानी खेळ शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी आवश्यक असून व्यक्तिमत्व विकासात मोठी भूमिका बजावत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईल गेम मध्ये न गुरफटता मैदानी खेळ खेळलेच पाहिजेत असे प्रतिपादन ऑर्किड द इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या सौ. प्रणिता मेंडसुरे यांनी केले आहे.

नगर तालुक्यातील धनगरवाडी येथील ऑर्किड द इंटरनॅशनल स्कूलमध्ये ६ फेब्रुवारी रोजी खेळ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांवर अप्रतिम असे नृत्य सादर करून सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. यादरम्यान मैदानी खेळाच्या विविध स्पर्धा पार पडल्या. फुटबॉल, धावणे, लिंबू चमचा, उलट दिशेला धावणे, कांगारू रेस, अशा स्वरूपाच्या अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन पारितोषिक मिळवले.



धनगरवाडी येथील ऑर्किड द इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित खेळ महोत्सवात विजेत्या खेळाडूंना पारितोषिके देताना प्राचार्या सौ. प्रणिता मेंडसुरे यांच्यासह मान्यवर.

## ऑर्किड इंटरनॅशनल स्कूलमध्ये खेळ महोत्सव साजरा

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेचे प्रशिक्षक महेश आनंदकर तसेच यश शर्मा उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना प्राचार्या प्रणिता मेंडसुरे यांनी सांगितले की, मैदानी खेळ शारीरिक, मानसिक आणि सामाजिक जीवन समृद्ध करत असतात. त्यामुळे प्रत्येकाने नियमितपणे मैदानी खेळ खेळून आरोग्यदायी जीवनशैली अवलंबणे गरजेचे आहे.


मोबाईलच्या युगात बालपणीच मुले मोबाईल मधील गेम खेळण्यात व्यस्त असतात. पारंपारिक तसेच मैदानी खेळ लोप पावत असल्याची खंतही सौ. मेंडसुरे यांनी व्यक्त केली. सर्व शिक्षक व पालकांनी आपल्या मुलांना मैदानी खेळ खेळण्यासाठी परावृत्त करावे असे आवाहन देखील मेंडसुरे यांनी केले. इयत्ता पहिलीतील विद्यार्थी वेदांत शशिकांत पवार याने कांगारु रेस मध्ये प्रथम पारितोषिक मिळविले तसेच इतर विद्यार्थ्यांनी देखील विविध स्पर्धांमध्ये पारितोषिक मिळवले.

स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र तसेच मेडल देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या प्रणिता मेंडसुरे, शिशिर देशमुख, आरुषा कोल्हटकर, क्रीडा शिक्षक तसेच ऑर्किड इंटरनॅशनल स्कूलच्या सर्वच शिक्षकांनी परिश्रम घेतले. यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रात्र शाळा ही संकल्पना महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी रुजवली

## ॲड. सुभाष काकडे यांचे प्रतिपादन; भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या स्नेहसंमेलनात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

नगर – रात्र शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून, त्यांना विकासाच्या प्रवाहात उभे करण्याचे कार्य भाई सथ्था नाईट हायस्कूल करत आहे. रात्र शाळा ही संकल्पना महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी रुजवली आहे. पुणे येथील भिडे वाड्यात त्यांनी विद्यार्जनाचे कार्य केले. हा वारसा पुढे घेऊन जाण्याचे कार्य ही संस्था करत असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. सुभाष काकडे यांनी केले.



हिंद सेवा मंडळ संचलित भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे ७३ वे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण उत्साहात पार पडले.

हिंद सेवा मंडळ संचलित भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे ७३ वे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाच्या उद्घाटनाप्रसंगी अध्यक्षीय भाषणात ॲड. काकडे बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक श्रीराम थोरात, सुरेश ढवळे, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक, माजी अध्यक्ष मधुसूदन मुळे, बालरोगतज्ञ डॉ. रमेश कोठारी, संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, नाईट हायस्कूलचे प्राचार्य सुनिल सुसरे, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य अनंत देसाई, जगदिश झालानी, ज्योती कुलकर्णी, शालेय समिती सदस्य संगीता बट, विलास बडवे, अलकाताई मुळे, दादा चौधरी मराठी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष येवले, मेहेर इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका अनुरूप झगडे, सिताराम सारडा विद्यालयाचे परिवेक्षक गोविंद धर्माधिकारी, नंदे सर, महाजन सर, शिंदे सर आदींसह पालक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. पारस कोठारी यांनी दिवसा अर्थार्जन करुन रात्री शिक्षणाने विद्यार्थी आपले भवितव्य घडवित आहे. मासूम संस्थेने केलेल्या मूल्यांकनात महाराष्ट्रातील सर्वात मोठी रात्रशाळा म्हणून भाई सथ्था नाईट हायस्कूल असून, नाईट शाळेच्या राज्याच्या प्रथम दहा क्रमांकाच्या गुणवत्ता यादीत इयत्ता दहावी मधील चार विद्यार्थी चमकले आहे. यावर्षी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना वेटिंगवर ठेवावे लागले. सर्वात जास्त २७३ महिला प्रवेशित झाल्या असून, मासूम संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणारे सहकार्य व शाळेतील सोयी–सुविधेबद्दल त्यांनी माहिती दिली.

प्राचार्य सुनिल सुसरे यांनी रात्र शाळेतील गुणवत्तेचा वार्षिक अहवाल सादर करुन इयत्ता दहावी मध्ये राज्याच्या गुणवत्ता यादीत चमकलेले विद्यार्थी, कला, क्रीडा, शैक्षणिक व विविध स्पर्धा परीक्षेत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आढावा घेतला. पाहुण्यांचा परिचय स्वाती होले यांनी करुन दिला.

अशोक कडूस म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणाचा प्रवाह बदलत आहे. दहावी, बारावीत किती टक्के गुण पडले? या गुणवत्तेला महत्त्व न राहता मुलांच्या कौशल्यावर त्याची प्रगती ठरणार आहे. अनेक क्षेत्र विद्यार्थ्यांची वाट पाहत असून, विविध संधी निर्माण झाल्या आहेत. शिक्षणाने प्रगल्भता आणण्याचे काम होणार आहे. जीवनात कौशल्य आत्मसात करण्यासाठी शिक्षण असण्याची गरज आहे. केवल अर्थार्जनासाठी शिक्षण नसून समाज परिवर्तनाचे माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले. तर निष्ठेने काम करुन सेवाधर्माने ब्रॅण्ड निर्माण करण्याचे त्यांनी आवाहन केले.

मधुसूदन मुळे यांनी रात्र शाळेतील प्रत्येक विद्यार्थी एक कादंबरी आहे. नाईट स्कूलचे शिक्षक पालकांप्रमाणे विद्यार्थ्यांची काळजी घेऊन त्यांना दिशा देत असल्याचे सांगितले.

डॉ. रमेश कोठारी यांनी आयुष्याच्या प्रगतीची सूत्रे सांगितली. शिरीष मोडक यांनी नाईट स्कूलमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सोयी–सुविधांचा फायदा घेऊन शिक्षणासाठी विद्यार्थ्यांनी प्रवाहात येण्याचे आवाहन केले. कला, क्रीडा, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात यश मिळविणाऱ्या रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृषाली साताळकर व अनुराधा दरेकर यांनी केले. आभार शिक्षक प्रतिनिधी बाळासाहेब गोरडे यांनी मानले. यावेळी शिवा शिंदे, कैलास करांडे, अलकाताई मुळे, सुभाष येवले, अनुरिता झगडे, धर्माधिकारी सर, दीपक शिंदे, कांबळे सर, शरद पवार, गजेंद्र गाडगीळ, महादेव राऊत, अमोल कदम, शिवप्रसाद शिंदे, संदेश पिपाडा, मंगेश भुते, अशोक शिंदे, कैलास करांडे, प्रशांत शिंदे, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, अविनाश गवळी, मनोज कोंडेजकर, कैलास बालटे, उज्वला साठे, वैशाली दुराफे, स्वाती होले आदींसह शिक्षक व शिक्षकेतर उपस्थित होते.

# महापालिकेने अहिल्यानगर शहरात चार ठिकाणी उभारले सोलर प्रकल्प

## २००० किलोवॅट वीजनिर्मिती होणार; बिलात ४.२० कोटींची बचत होणार

नगर – महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांच्या वीज बिलाच्या



खर्चात बचत व्हावी, या उद्देशाने शहरात चार ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आले आहेत. राज्य शासनाने यासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. या प्रकल्पातून निर्मिती होणारी वीज तेथील प्रकल्पातच वापरली जाणार आहे. या माध्यमातून महानगरपालिकेची सुमारे ४ कोटी २० लक्ष रुपयांची बचत होणार आहे. लवकरच हे प्रकल्प कार्यान्वित होणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

यशवंत डांगे यांनी सौर ऊर्जा प्रकल्पाचा आढावा घेतला. शहरात राज्य शासनाच्या १० कोटी व महानगरपालिकेच्या २.७० कोटींच्या अशा १२.७० कोटींच्या निधीतून नालेगाव अमरधाम येथे २५० किलोवॅट, सावेडी कचरा डेपोच्या जागेत ३०० किलोवॅट, बुरुडगाव कचरा डेपो ५०० किलोवॅट, मलनिस्सारण प्रकल्प येथे ९५० किलोवॅट क्षमतेचा वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यात आले आहे. यात निर्मिती होणाऱ्या वीजेचे वार्षिक ३० लक्ष युनिट संबंधित जागेतील प्रकल्पात खर्च होणार आहेत. त्यातून ४ कोटी २० लक्ष रुपयांची वीज बिल बचत होणार आहे. सोलर पॅनल सिस्टीम उभारण्यात आली आहे. लवकरच ट्रान्सफॉर्मर बसवले जाणार आहेत. त्यानंतर हे चारही प्रकल्प कार्यान्वित होणार आहेत.


महानगरपालिकेने यापूर्वी शहरात अमृत अभियानांतर्गत आठ ठिकाणी सोलर पॅनल सिस्टीम उभारली आहे. त्याद्वारे १६५० किलोवॅट वीज निर्मिती केली जात आहे. महानगरपालिकेचा विविध प्रकल्पांवर होणार वीजबिलाचा खर्च मोठा आहे. या चार प्रकल्पांमुळे महानगरपालिकेच्या वीजबिलात बचत होणार असल्याचे यशवंत डांगे यांनी सांगितले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## खोल समुद्रातील प्रकाश संश्लेषण

पानांमधील हरितद्रव्य, हवा आणि प्रकाशाच्या साहाय्याने वनस्पती प्रकाश संश्लेषण क्रियेद्वारे स्वतःचे अन्न तयार करतात, हे आपल्याला माहिती आहे. या क्रियेसाठी सूर्यप्रकाशाची नितांत गरज असते. समुद्रतळाशी सूर्यकिरणे पोहोचू शकत नाहीत. मात्र, जवळजवळ अंधारच असलेल्या किंवा अत्यंत तुरळक प्रकाश असलेल्या अशा ठिकाणच्या वनस्पतीही प्रकाश संश्लेषण करतात, असे आढळून आले आहे. आर्क्टिक महासागराच्या पृष्ठभागापासून १६० फूट खोलीवर अशा वनस्पती प्रकाश संश्लेषण करीत असल्याचे संशोधकांना आढळले.




पूर्वीच्या अनुमानापेक्षा अत्यंत कमी प्रकाशातही वनस्पती वाढू शकतात, असे या नव्या संशोधनातून दिसून आले आहे. मायक्रोअल्गी या जलीय शैवालाच्या अभ्यासातून ही बाब स्पष्ट झाली. या संशोधनाची माहिती नेचर कम्युनिकेशन्स या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. जर्मनीतील संशोधकांनी याबाबतचे संशोधन केले. आर्क्टिक महासागराच्या पृष्ठभागापासून १६४ फूट म्हणजेच ५० मीटर खोलीवर कमी प्रकाशाच्या स्तरात वनस्पती कसे प्रकाश संश्लेषण करतात, हे त्यांनी पाहिले. या वनस्पती सूर्यप्रकाशाचे आपल्या पानांमधील हरितद्रव्याच्या साहाय्याने ऊर्जेत रूपांतर करतात. त्यासाठी त्यांना अतिशय कमी प्रकाशही पुरेसा होतो. त्या सर्वात कमी प्रकाश स्तरातही ही क्रिया करतात. अशा कमी प्रकाशातही तग धरून राहण्याची क्षमता वनस्पतींनी स्वतःमध्ये विकसित केलेली आहे, हे आश्चर्यकारक संशोधन यामधून झाले. जमिनीवरही अनेक ठिकाणी कमी सूर्यप्रकाश मिळणारी ठिकाणे आहेत. त्यामध्ये युरोप, अमेरिकेतील थंड हवामानाच्या अनेक ठिकाणांचा समावेश होतो. अशा ठिकाणी कमी सूर्यप्रकाश उपलब्ध असतानाही पिकांची चांगली वाढ कशी होईल, याबाबतच्या संशोधनासाठी हे नवे संशोधन साहाय्यक ठरू शकते. ◆◆◆

## जनुकात अचूक बदल शक्य

जगभरात जीन्स म्हणजेच जनुकांबाबतही वेगवेगळे संशोधन होत असते. जनुक संपादनातील प्रकाशाचा वापर करण्याची एक वेगळी पद्धतही वैज्ञानिकांनी शोधून काढली आहे. त्यामध्ये जनुकांचे संपादन अधिक अचूक पद्धतीने करता येते. पेशीतील जनुके नियंत्रित करण्याचा हा प्रभावी उपाय सापडला असल्याचे अमेरिकेतील पीटसबर्ग विद्यापीठातील संशोधक अॅलेक्झांडर डेटर्स यांनी म्हटलेले आहे.

या नवीन पद्धतीमुळे जनुकाचे पेशीतील स्थान व वेळ ठरवता येते. त्यामुळे एखादा जनुक अचूकतेने काढूनही टाकता येतो. सीआरआयएसपीआर-कॅस-९ या जनुक संपादन साधनाचा शोध २०१३ मध्ये लावण्यात आला होता. या पद्धतीत जीवाणूपासून मिळवलेले कॅस-९ हे प्रथिन व आरएनएची कृत्रिम मार्गदर्शक व्यवस्था जिनोममध्ये काप घेऊन जनुकाची दुरुस्ती करू शकते किंवा अपेक्षित उत्परिवर्तन म्हणजे म्युटेशन्स आणू शकते. प्रत्यक्षात सीआरआयएसपीआर (क्लस्टर्ड रेग्युलरसली इंटरस्पेस्ड शॉर्ट पॅलिंडॉमिक रिपीटस ऑफ डीएनए बेस सिक्वेन्सेस) ही पद्धत सिस्टीक फायब्रॉसिस व सिकल सेल अॅनिमिया या रोगांवर बरीचशी परिणामकारक ठरली आहे. प्रयोगशाळेत माणसाला होणारे रोग प्राण्यांमध्ये निर्माण करून त्यांच्यावर प्रयोग करण्यात आले आहेत. कीटकांना दाद न देणाऱ्या गव्हाच्या प्रजातीही तयार करणे शक्य झाले आहे. नवीन अभ्यासानुसार संशोधकांना लायसिन या अमायनो आम्लाचे अवशेष कॅस-९ मध्ये आढळून आले आहेत.



आताच्या नवीन प्रयोगात कॅस-९ प्रथिनाला जैविकदृष्ट्या निष्क्रिय करता येते, जैविक पिंजऱ्यात बंदिस्त करून ठेवता येते व प्रकाशाच्या मदतीने तो पिंजरा उघडता येतो. पिंजरा उघडेपर्यंत काही विकरांना कृतिशील करता येते शिवाय जनुकीय संपादन करता येते. पूर्वी कॅस-९ चे काम नियंत्रित करणे अवघड होते. कॅस-९ वर प्रकाशाचा झोत सोडून अधिक चांगल्या प्रकारे जनुकीय संपादन करता येते. अमुक पेशीत अमुक वेळी जनुकात बदल करायचा आहे तर ते आता शक्य आहे, असे डेटर्स यांनी म्हटले आहे. हा शोधनिबंध जर्नल ऑफ द अमेरिकेन केमिकल सोसायटी या नियतकालिकात प्रसिद्ध झालेला आहे. ◆◆◆

## हिरव्या मिरचीचे गुणधर्म

भारतीय आहारपद्धतीत हिरव्या किंवा लाल मिरचीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असतो. आपल्याकडे हिरवी मिरची खर्डा किंवा ठेचा, मिरची भजी, तळलेली मिरची अशा स्वरुपातही खाल्ली जात असते. पोह्यांसारखे नाश्त्याचे पदार्थ असोत किंवा भाजी असो, हिरव्या मिरचीचे तुकडे त्यामध्ये चवीसाठी घातलेले असतातच. अर्थात, केवळ चवीसाठीच हिरवी मिरची गुणकारी नाही. आरोग्यासाठीही या मिरचीचे अनेक लाभ असल्याचे तज्ज्ञ सांगतात.



मिरचीचे योग्य प्रमाणात नियमितपणे सेवन केल्यास आरोग्यास अनेक लाभ मिळू शकतात. हिरव्या मिरचीमध्ये क जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक क्षमता वाढते. हिरव्या मिरचीत फायबरही अधिक असतात. त्यामुळे शरीराची पचनप्रक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत मिळते. हिरव्या मिरचीत कॅप्साइसिन नावाचे तत्त्व असते, ज्यामुळे चयापचयाची क्षमता वाढते आणि वजन नियंत्रणात राहते. हिरव्या मिरचीत अँटी ऑक्सिडंट्स असतात. त्यामुळे शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रणात राहते. परिणामी, हृदयविकाराचा धोका कमी होतो. हिरव्या मिरचीतील कॅप्साइसिन तत्त्व शरीरातील एंडोर्फिन्सची पातळी वाढवते. त्यामुळे स्नायुदुखीपासून आराम मिळतो. हिरव्या मिरचीच्या सेवनाने रक्तशर्करेची पातळी नियंत्रणात ठेवण्यासही मदत मिळते. ◆◆◆


## ओराफिश माशाचे दुर्मीळ दर्शन

जगाचा अंत होणार, पण कधी आणि कसा याबाबत बरेच दावे केले जातात. काही घटना अशा आहेत ज्याचा संबंध जगाच्या अंताशी जोडला जातो. या घटना म्हणजे जगाच्या अंताचे संकेत मानले जातात. त्यापैकीच एक म्हणजे हा मासा, ज्याला शापित मानलं जातं. जो दिसणं म्हणजे काहीतरी भयंकर घडणार. आता हा मासा दिसला त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. ऑस्ट्रेलियाच्या समुद्रकिनाऱ्यावर हा डुम्सडे फिश ज्याला 'ओराफिश' असंही म्हटलं जातं, हा दुर्मीळ मासा सापडला आहे. कर्टिस पिटरसन नावाच्या व्यक्तीला तिवी आयलँडवर हा मासा सापडल्याची माहिती आहे. याचे फोटोही सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आले आहे.



हा मासा जेव्हा जेव्हा दिसला तेव्हा तेव्हा भूकंप आला आहे. १५ वर्षांपूर्वी जपानमध्ये जेव्हा भूकंप आला तेव्हासुद्धा हा मासा दिसला होता. त्यानंतर या माशाचा आणि भूकंपाचा संबंध जोडला जाऊ लागला. हा मासा दिसल्यानंतर भूकंप येतो, असं लोक म्हणू लागले. द मिररच्या रिपोर्टनुसार, पर्यावरणीय भूकंपशास्त्रज्ञ कियोशी वडात्सुमी यांनी मात्र हा निव्वळ योगायोग असल्याचे स्पष्ट केले आहे. समुद्राच्या तळाजवळ राहणारे खोल समुद्रातील मासे हे समुद्राच्या पृष्ठभागाजवळील माशांपेक्षा हालचालींबद्दल अधिक संवेदनशील असतात, असे ते म्हणतात.

## सर्वात लहान आकाराचा बल्ब



जगभरात अतिशय सूक्ष्म अशा वस्तूही बनवल्या जात असतात. सध्याच्या नॅनोटेक्नॉलॉजीच्या काळात तर याबाबत अफलातून कामगिरी करता येऊ शकते. तुम्हाला माहिती आहे का, जगातील सर्वात लहान दिवाही तयार करण्यात आलेला आहे? तो ग्राफिनच्या एका अणुइतक्या जाडीचा आहे. त्यामुळे ग्राफिन आता स्मार्टफोन, संगणक, मोटारी व इमारती तसेच उपग्रह यांचे रूप बदलून टाकणार आहे.

जगातील सर्वात लहान विद्युत बल्ब अतिशय पातळ अशा ग्राफिनच्या थरापासून अतितप्त होऊ शकणारे आपल्या नेहमीच्या बल्बमध्ये असते तसे तारेचे वेटोळे तयार करण्यात आले आहे. ते २५०० अंश सेल्सिअस तापमानाला प्रकाशमान होते. आण्विक पातळीवर असला तर या बल्बचा प्रकाश नुसत्या डोळ्यांनी दिसतो इतका प्रखर आहे. ज्या सिलिकॉन चिपवर तो बसवलेला असतो, तिचे कुठलेही नुकसान या जास्त तापमानामुळे होत नाही. नवीन प्रकारची स्वीच, प्रकाशीय संगणक, डिजिटल माहितीचे वहन यात त्याचा उपयोग होणार आहे. माहितीचे वहन सिलिकॉन चिपपेक्षा वेगाने होईल, असा वैज्ञानिकांचा दावा आहे. न्यूयॉर्कमधील कोलंबिया विद्यापीठातील मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे प्राध्यापक जेम्स होन यांनी सांगितले की, संगणकाच्या चिपवर प्रथमच प्रकाशस्रोत तयार करण्यात आला आहे. हे संशोधन 'नेचर नॅनोटेक्नॉलॉजी' या नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहे. होन यांच्या दाव्यानुसार जगातील सर्वात लहान विद्युत बल्ब तयार करण्यात त्यांना यश आले असून, यात नवीन प्रकारचा ब्रॉडबँड प्रकाश उत्सर्जक वापरण्यात आला आहे. त्यामुळे अणुएवढा जाडीच्या लवचिक पदार्थातून प्रकाश मिळवता आला आहे. त्याचा संदेश वहनात मोठा उपयोग होईल. ग्राफिन हा पदार्थ रशियन वैज्ञानिकांनी मँचेस्टर विद्यापीठात शोधून काढला होता व तो कार्बनच्या जाळ्यासारख्या रचनेचा बनलेला असतो. त्याची जाडी एका अणुएवढी असते. तो खूपच हलका आणि विजेचा तो पूर्णवाहक असतो.

## उत्खननात सापडली दोनशे वर्षांपूर्वीची चिठ्ठी

इतिहासाची पाळंमुळं शोधण्याच्या कारणामुळे आजवर अनेक भागांमध्ये, अनेक महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये पुरातत्त्व विभागापासून या क्षेत्रात सक्रिय असणाऱ्या अनेक संघटनांनी उत्खनन करत कैक अचंबित करणाऱ्या गोष्टी जगापुढे आणल्या आहेत. पुरातन काळातील नाणी, भांडी, गतकाळातील जीवनशैलीवर भाष्य करणारे मानवी संस्कृतीचे अनेक पुरावे आजवर समोर आले आहेत. त्यातच आता एक अशी गोष्ट अभ्यासकांच्या हाती लागली आहे की, जी पाहून त्यांनाही आपण काहीतरी मोठा टप्पा साध्य केल्याची प्रचिती येत आहे.


फ्रान्समधील एका क्षेत्रामध्ये पुरातत्त्व विषयाचा अभ्यास करणाऱ्या काही विद्यार्थ्यांना एक कमाल गोष्ट हाती लागली. गॉलिश टाऊन येथे उत्खनन करतेवेळी त्यांच्या हाती एक लहानशी काचेची बाटली लागली. एका मातीच्या माठवजा भांड्यामध्ये ही बाटली सापडली. अभ्यासकांच्या मते, २०० वर्षांपासून ही बाटली लपवण्यात आली होती. या बाटलीतील ही चिठ्ठी एका अभ्यासकाची असून, त्या अभ्यासकानंही या क्षेत्रामध्ये उत्खननाचं काम केल्याचं म्हटलं गेलं. गिलैम ब्लॉडेल यांनी यावेळी या निरीक्षणपर मोहिमेचे नेतृत्त्व केले




असून, हाती लागलेल्या पुराव्यांना त्यांनी परीक्षणासाठी पाठवले आणि चिठ्ठीतील मजकुरासह त्यावर लिहिलेलं नाव समोर आलं. पी. जे. फेरेत हे एक स्थानिक प्रस्थ असून, स्थानिक नोंदींमध्ये नमूद असणाऱ्या माहितीनुसार त्यांनीही या भागात २०० वर्षांपूर्वी उत्खनन केल्याचे पुरावे आहेत. इतिहासकारांपासून पुरातत्त्व विभागातील मंडळींसाठी हा एक मोठा टप्पा असून, येत्या काळात त्यांना गॉलिश गाव आणि संस्कृतीला आणखी जवळून निरीक्षण करण्याची संधी या चिठ्ठीच्या माध्यमातून मिळणार आहे, असं म्हटलं जात आहे.

## बुरशीजन्य संसर्गाचा धोका वाढला

जगभरात सध्या बुरशीजन्य संसर्गाचा धोका वाढत असल्याचे दिसून आले आहे. एवढंच नव्हे तर याच्या उपचाराकरिता वापरली जाणारी औषधे प्रभावहिन होत असल्याचे संशोधनात आढळले आहे. या चोरपावलांनी पसरत असलेल्या धोक्याची वेळीच दखल घेणे गरजेचे असल्याचेही तज्ज्ञांचे म्हणणे आहे.



ब्रिटनच्या मँचेस्टर विद्यापीठातील आण्विक जीवशास्त्रज्ञ नॉर्मन व्हॅन रिजन यांच्या मते, जागतिक आरोग्य चर्चांमध्ये बुरशीजन्य रोगजनक आणि अँटिफंगल प्रतिरोधकतेच्या धोक्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. तातडीचे लक्ष न दिल्यामुळे किंवा कारवाई न केल्यामुळे बुरशीजन्य संक्रमण वर्षाला ६.५ दशलक्ष लोकांना संक्रमित करते. एवढंच नव्हे तर यामुळे दरवर्षी ३.८ दशलक्ष लोकांचा बळी जातो. याकडे लक्ष दिलं नाही तर हा आकडा आणखी धोकादायक बनू शकतो, असा इशाराही संशोधकांनी दिला आहे.

बुरशीजन्य संसर्गाचा प्रभाव कमी रोगप्रतिकारशक्ती असलेल्यांना होत आहे. नॉर्मन व्हॅन रिजन आणि शास्त्रज्ञांचा एक आंतरराष्ट्रीय गट सरकार, संशोधन समुदाय आणि फार्मास्युटिकल उद्योगाला 'बॅक्टेरियाच्या पलीकडे पाहा' असं आवाहन करत आहे. चीन, नेदरलँड्स, ऑस्ट्रिया, ऑस्ट्रेलिया, स्पेन या देशांतील संस्थांमधून आलेल्या नॉर्मन व्हॅन रिजन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगितले की, 'गेल्या दशकांमध्ये औषधांच्या प्रतिकारशक्तीच्या समस्यांची संख्या पाहता, जीवाणूंकडे असमान लक्ष देणे चिंताजनक आहे. एस्परगिलस फ्युमिगॅटससारख्या बुरशीजन्य रोगाचा फुफ्फुसांवर आणि कॅन्डिडा म्हणजे जीभेवर परिणाम होते. कमकुवत रोगप्रतिकार प्रणाली असलेले लोक आणि वृद्ध प्रौढांना सर्वाधिक धोका असतो. जीवाणू आणि विषाणूंच्या तुलनेत बुरशी हे अधिक क्लिष्ट जीव आहेत. ज्यामुळे शरीरातील इतर महत्त्वाच्या पेशींना हानी न करता बुरशीच्या पेशी नष्ट करणारे औषध विकसित करणे शास्त्रज्ञांना कठीण आणि अधिक महाग होते. सध्या अँटिफंगल औषधांचे फक्त चार वर्ग आहेत. ◆◆◆

## मूळव्याधीवर आयुर्वेदोपचारांचा दिलासा

खा मूळव्याध हा गुदद्वाराशी संबंधित विकार आहे. यामध्ये मलाशयाच्या किंवा गुदद्वाराच्या शिरेमध्ये सूज येते. यामुळे वेदना, जळजळ, रक्तस्राव आणि अस्वस्थता जाणवते. मूळव्याध प्रामुख्याने दोन प्रकारांमध्ये विभागला जातो: एका प्रकारात मूळव्याध गुदद्वाराच्या आत विकसित होते. सुरुवातीला याचा कोणताही त्रास होत नाही, परंतु पुढील टप्प्यात रक्तस्राव किंवा वेदना जाणवू शकतात. दुसरा प्रकार म्हणजे बाह्यरुपातील मूळव्याध. यामध्ये गुदद्वाराच्या बाहेर त्वचेखाली वेदनादायक गाठी जाणवतात. वारंवार कठीण मल होणे, शौचास होताना जास्त दाब द्यावा लागणे असे त्रास होत असल्यास सतर्क होणे गरजेचे ठरते. जड अन्नाचे नियमित सेवन, आहारातील फायबर युक्त पदार्थांची कमतरता, कमी प्रमाणात पाणी पिणे, बैठी जीवनशैली, व्यायामाचा अभाव, ताणतणाव यामुळे मूळव्याधीची समस्या उद्भवते. सतत बसून राहिल्यास रक्ताभिसरण बिघडून मूळव्याध वाढू शकतो. गर्भाशयाच्या वाढत्या दाबामुळे काही महिलांना मूळव्याध होऊ शकतो. अतिमसालेदार व जंक फूड हे पचनसंस्थेवर परिणाम करतात आणि मूळव्याधीची शक्यता बळावते. गुदद्वाराच्या भागात वेदना होऊ लागल्यास, मलातून रक्तस्राव झाल्यास, या भागात जळजळ आणि खाज येत असल्यास, गुदद्वाराजवळ गाठी किंवा फुगलेल्या शिरा जाणवत असल्यास वैद्यकीय उपचार घेणे गरजेचे ठरते. मूळव्याध, रक्तस्राव व गुदद्वाराशी संबंधित आजारांवर अनेक उपाय उपलब्ध आहेत, परंतु यामध्ये आयुर्वेदिक उपचार अधिक सुरक्षित आणि प्रभावी मानले जातात. या उपचारांमध्ये बद्धकोष्ठता आणि



गॅसेसच्या समस्येवर नियंत्रण ठेवले जात असल्यामुळे पचनक्रिया सुरळित होण्यास मदत होते. याखेरीज यकृताच्या कार्यक्षमतेला चालना देऊन रक्ताभिसरण सुरळीत केले जाते. आयुर्वेदिक उपचारांमुळे गुदद्वार आणि मलाशयातील सूज व ताण कमी होतो. मुख्य म्हणजे यामुळे रक्तस्राव थांबवून वेदना कमी होतात. यामुळे रुग्णांना दिलासा मिळतो.

आयुर्वेदिक उपचार संसर्गाची प्रक्रिया थांबवून जखमा भरून येण्यास मदत करतात. आयुर्वेदातील अनेक औषधे बाजारातून आणून ती घेणे हे बहुतेकांना त्रासाचे वाटते. वास्तविक, या औषधांचे, वनौषधींचे सुयोग्य प्रमाणात मिश्रण केलेली औषधेही बाजारात उपलब्ध असतात. बदलत्या काळात कॅप्सूल रुपातही अशा प्रकारची औषधे उपलब्ध आहेत. अर्शासवसारखे मूळव्याधीवर प्रभावी ठरणाऱ्या वनौषधींनी बनलेले औषध या आजारावर चांगला आराम देणारे ठरते. यामध्ये हरितकी अर्क, दारुहळद, तुरटी, गोदंती भस्म, मोचरस, कडूनिंबाच्या बिया यांचा समावेश केलेला असतो. तज्ज्ञांच्या सल्ल्याने या औषधाचे सेवन केल्यास मूळव्याध, रक्तीमूळव्याधीच्या समस्येचा कायमचा निपटारा होऊ शकतो.

**– डॉ. सुरेश मिर्जापूर,**
**नागपूर संपर्क : ९३७३११९२९२**

### हेही लक्षात ठेवा.

* आजार झाल्यानंतर उपचारांमागे धावण्याऐवजी वेळीच सतर्क होऊन जीवनशैलीत बदल केल्यास मूळव्याधीची समस्या टाळता येऊ शकते. यासाठी–
* हिरव्या पालेभाज्या, फळे आणि संपूर्ण धान्ये सेवन करा.
* दिवसभरात किमान ८-१० ग्लास पाणी प्यावे.
* चालणे, योगासने आणि हलका व्यायाम करा.
* बद्धकोष्ठता टाळण्यासाठी नैसर्गिक रेचक पदार्थ जसे की, मनुका, आळशीचे बी किंवा तुपातली भाकरी खा.
* सतत बसून राहिल्याने गुदद्वारावर ताण येतो. त्यामुळे अधूनमधून उठून चालावे.
* जर मूळव्याध खूप वाढला असेल, सतत रक्तस्राव होत असेल किंवा इतर कोणत्याही उपचारांनी आराम मिळत नसेल, तर डॉक्टर शस्त्रक्रियेचा सल्ला देऊ शकतात. लक्षात ठेवा, मूळव्याध ही लाज वाटण्यासारखी गोष्ट नसून ती एक सामान्य समस्या आहे. योग्य आहार, जीवनशैलीतील सुधारणा आणि आयुर्वेदिक उपचार घेतल्यास हा त्रास टाळता येऊ शकतो. ◆◆◆

## महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतील विजेत्यांना १३ फेब्रुवारीला मिळणार अंगठ्या व गाड्या

नगर – नुकत्याच अहील्यानगरमध्ये झालेल्या ६७ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतील विजेत्या व पदक प्राप्त मल्लांना १३ फेब्रुवारी रोजी बक्षीसे मिळणार आहेत. यामध्ये दोन चारचाकी गाड्या, बुलेट व स्प्लेंडर या दुचाकी गाड्या व सोन्याच्या अंगठ्यांचा समावेश आहे. हा वितरण समारंभ राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष व संयोजक आमदार संग्राम जगताप व राज्य कुस्तीगीर संघाचे सचिव, हिंद केसरी योगेश दोडके यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता भोसले लॉन येथे होणार आहे, अशी महिती राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे यांनी दिली.

यामध्ये महाराष्ट्र केसरी किताब विजेता, उपविजेता यांच्यासह माती विभागातील ३० व गादी विभागातील ४० कुस्तीगीरांना बक्षिसे देण्यात येणार आहेत. स्पर्धेतील पदक विजेत्या कुस्तीगीरांनी बक्षीस रूपाने मिळणाऱ्या गाड्या रजिस्ट्रेशन करण्यासाठी लागणारी कागदपत्रे बरोबर आणावीत.

माहितीसाठी व कागदपत्रे जमा करण्यासाठी जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव डॉ. संतोष भुजबळ मो.नं ९६५७६१००९५ व कार्यालयीन सचिव निलेश मदने मो.नं ९२२५९८५५५५ यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्वच्छतेसाठी सरसावले विविध प्रांतातील युवक-युवती

### पंडित जवाहरलाल नेहरु पुतळा परिसर केला स्वच्छ; राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक युवा शिबिरातील उपक्रम





मनपाच्या सहकार्याने लालटाकी येथील पंडित जवाहरलाल नेहरु पुतळा परिसरात देशभरातील २७ राज्यातील ३५० पेक्षा अधिक तरुण स्वयंसेवकांनी स्वच्छता अभियान राबविले.

नगर – शहरात होत असलेल्या राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक युवा शिबिरात देशातील विविध प्रांतातून सहभागी झालेल्या युवक-युवतींनी लालटाकी येथील पंडित जवाहरलाल नेहरु पुतळा परिसरात स्वच्छता अभियान राबविले. स्वछतेसाठी सरसावलेल्या युवक युवतींनी संपूर्ण पुतळ्याचा उद्यान परिसर चकाचक करुन एकप्रकारे पुनरुज्जीवन केले.

महानगरपालिकेच्या सहकार्याने आयोजित कार्यक्रमात देशभरातील २७ राज्यातील ३५० पेक्षा अधिक तरुण स्वयंसेवकांनी स्वच्छता केली. सर्व घटक राज्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रादेशिक भाषेतून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देत, देश की ताकद नौजवान..., भाईजी की कामना, सद्भावना सद्भावना..., जोडो जोडो भारत जोडे.... या दिलेल्या घोषणांनी परिसर दणाणला. स्वच्छतेसोबत देशभक्तीपर गाणी देखील गाण्यात आली.

या स्वच्छता अभियानात महापालिकेचे अधिकारी शुभम पाटील, श्याम असावा, करायिल सुकुमारन, रणसिंग परमार, संदीप कुसाळकर, सुरेश मैड, पंकज झाला (गुजरात), यशपाल कपूर (हिमाचल प्रदेश), आशा राणी (हरियाणा), कनिका हजवडीकर (आसाम) अनन्या (मध्यप्रदेश) आणि अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक डॅनियल आदींसह शिबिरातील युवक-युवती, महापालिकेचे कर्मचारी यांचा समावेश होता.

स्वच्छता करुन पंडित जवाहरलाल नेहरूंच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करण्यात आली. या ठिकाणाच्या ऐतिहासिक महत्त्वाबद्दल माहिती देतांना नेहरुजींनी त्यांचे जगप्रसिद्ध पुस्तक डिस्कव्हरी ऑफ इंडिया हे शहरातील भुईकोट किल्ल्यात लिहल्याची माहिती देण्यात आली.

महापालिकेतील अधिकाऱ्यांनी परवानगी दिल्यास युवान राष्ट्रीय युवा प्रकल्पाच्या सहकार्याने नगरच्या उद्यानाच्या देखभालीची जबाबदारी घेण्यास तयार असल्याचे संदीप कुसळकर यांनी जाहीर केले.



प्रभाग क्र.८ मधील बालीकाश्रम रोडवरील गिते हॉस्पिटल पसिरातील रस्ता कॉक्रीटीकरण कामाचा शुभारंभ माजी महापौर सौ.रोहिणी शेंडगे यांच्या हस्ते झाला

# सर्वांच्या समन्वयातून शहराचा सर्वांगिण विकास

### माजी महापौर रोहिणी शेंडगे यांचे प्रतिपादन; बालिकाश्रम रोडवरील गिते हॉस्पिटल परिसरातील रस्त्याच्या कॉक्रीटीकरण कामाचा शुभारंभ

नगर – महापौर पदाच्या कालावधीत फक्त प्रभागाचाच नव्हे तर पुर्ण शहराच्याच विकासासाठी नागरीकांसह नगसेवकांचे सहकार्य मिळाले. प्रत्येक प्रभागातील विकासासाठी पदाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन देत नागरिकांचे प्रश्न मार्गी लावले आहेत. त्याचबरोबर महापौर असताना प्रत्येक प्रभागाच्या विकासात भर टाकणारी कामे केली व काही सुरु आहेत. नागरिकांना सर्व सुविधा मिळाव्यात, त्याचे प्रश्न सुटावेत, यासाठी सातत्याने प्रयत्न केले. नागरिकांच्या सहकार्याने प्रत्येक भागात चांगली कामे झाल्याचे समाधान आहे. अनेक कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण कटीबद्ध आहे. सर्वांच्या एकत्रित समन्वयातून शहराचा सर्वांगिण विकास करण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे माजी महापौर रोहिणी शेंडगे यांनी केले.

प्रभाग क्र.८ मधील बालीकाश्रम रोडवरील गिते हॉस्पिटल पसिरातील रस्त्याच्या कॉक्रीटीकरण कामाचा शुभारंभ सौ.रोहिणी शेंडगे यांच्या हस्ते झाला. यាप्रसंगी गटनेते संजय शेंडगे, नगरसेवक सचिन शिंदे, शाम नळकांडे, संदिप दातरंगे, डॉ.अनिरुद्ध गिते, अरुण पानसरे, राजेंद्र गांधी, विजय मालपाणी, सचिन निसळ, बाळसाहेब कापसे, स्वप्निल अडसूळ, गणेश जाधव, रवि कापसे, शुभम पंतगे, अनंत जोशी, राहुल कोकरे, किरण भारदे, आर्यन जाधव, गणेश पिसका, बोराडे, लक्ष्मण शहाणे, प्रकाश जोगदे, अशोक यमगर, सौ.कल्पना जोशी, मनिषा उबाळे, अर्चना येवले, अशलेशा भंडारकर, पै.शुभम दातरंगे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी शाम नळकांडे म्हणाले की, शहरातील कामांसाठी सौ.रोहिणीताई शेंडगे यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे. त्यामुळे अनेक कामे झाली आहेत. नागरिकांना सोयी-सुविधा देण्यासाठी कायम तत्पर असतात. शुभारंभ होत असलेल्या कॉक्रीटीकरणामुळे परिसरातील नागरिकांची मोठी सोय होणार आहेत.

यावेळी सचिन शिंदे म्हणाले की, आपल्या प्रभागासाठी सर्वात जास्त निधी रोहिणीताई शेंडगे यांनी दिल्यामुळे रस्ते, ड्रेनेज, पाणीप्रश्न सुटण्यास मोठी मदत झाली आहे. आम्ही सेवक म्हणून भुमिका पार पाडतो. नागरीकांचे समाधान विकास कामांमधून केले. तुमचे प्रश्न सोडविणे हे आमचे कर्तव्य समजतो.

यावेळी महापौर व नगरसेवकांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन राजेंद्र गांधी यांनी केले. बाळासाहेब कापसे यांनी आभार मानले.

# 'रोटरी क्लब ऑफ मुंबई ट्रस्ट'मार्फत 'आकांक्षा'च्या दिव्यांगांना वस्तू प्रदान

### देवेंद्र वैद्यचा सन्मान



रोटरी क्लब ऑफ मुंबई माहिम ट्रस्ट मार्फत 'आकांक्षा'तील दिव्यांगांना वस्तू प्रदान प्रसंगी रोटरीचे सुप्रिया सापळे, सुनिता पडवळ, गुरमित कौर, उषा सेशन, नीता उपाध्याय, 'आकांक्षा'च्या सौ. सविता काळे आदी. दुसऱ्या छायाचित्रात आंतरराष्ट्रीय बुद्धीबळपटू देवेंद्र वैद्यचा 'आकांक्षा'च्यावतीने सन्मान करताना सविता काळे. (छाया – उदय जोशी)

नगर – रोटरी क्लब ऑफ मुंबई माहिम ट्रस्ट मार्फत 'आकांक्षा'च्या दिव्यांगांना वस्तू प्रदान करण्यात आल्या. यावेळी रोटरीचे सुप्रिया सापळे, सुनिता पडवळ, गुरमित कौर, उषा सेशन, नीता उपाध्याय, 'आकांक्षा'च्या सौ. सविता काळे, रोटरी क्लब अहमदनगर प्रियदर्शिनीच्या प्रतिभा धूत, आशाताई फिरोदिया, प्रेसिडेंट मीनल बोरा, ज्योती गांधी, अनुराधा आठरे आदी उपस्थित होत्या.

सुनिता पडवळ म्हणाल्या 'आकांक्षा' जे काम करते ते अवर्णनीय असून कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे आपल्या घासातील एक घास समाजातील वंचित घटकाला त्या देत आहेत त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद यांची ती पावती आहे. 'आकांक्षा' दिव्यांगाना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी जी मदत करते ती कौतुकास्पद आहे.

सौ.सविता काळे प्रास्ताविकात 'आकांक्षा'चे विश्वस्त व रोटरी क्लब ऑफ मुंबई माहिम ट्रस्टचे माजी अध्यक्ष रो. आनंद लिमये यांच्या सहकार्याने यांना ही मदत मिळत आहे. 'आकांक्षा' करत असलेले काम दिव्यांगाच्या उर्जेतून होत असून समाजातील विविध घटक हे त्याला मदत करतात आम्ही यात फक्त खारीचा वाट्याचे काम करत आहोत खरं काम हे दिव्यांगच करत आहेत कोणत्याही प्रकारचे सरकारी अनुदान किंवा याचनेची अपेक्षा न करता 'आकांक्षा' हे काम करत आहे. दिव्यांग स्वत: च्या पायावर उभे राहिल्यानंतर आम्हालाच उर्जा मिळते. दिव्यांगत्वावर मात करत कर्णबधिर देवेंद्रने बुद्धिबळ पटू म्हणून आंतरराष्ट्रीयस्तरावरचं यश अभिमानास्पद, कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे.

आंतरराष्ट्रीय कर्णबधीर बुद्धीबळपटू देवेंद्र वैद्य यांचा सन्मान चिन्ह व रु.११,००० रु देउन सन्मान 'आकांक्षा'च्या संचालिका सविता काळे व 'आकांक्षा' परिवाराच्या वतीने करण्यात आला. रोटरी क्लब ऑफ मुंबई माहिमच्यावतीने अंजली सूर्यवंशी (लॅप टॉप), श्रीमती अंबिका पिंपळे (आटाचक्की), श्रीमती अंजली तरवडे (शिलाई मशिन) या वस्तू प्रदान करण्यात आल्या.

प्रथमत स्वागत अंजली सूर्यवंशी हिने केले. सौदागर लोंढे, प्रतिक्षा काळे, मुरकुटे यांनी मनोगत व गाणी सादर केली. आभार अंजली सूर्यवंशी हिने मानले.

# श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाचा गंधर्व परीक्षेत १०० टक्के निकाल

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या नोव्हेंबर २०२४ या सत्रातील परीक्षेत 'श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या' विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. यावेळीही उत्तम यश मिळवून विद्यालयाची १००% निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.

गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या भरतनाट्यमच्या प्रारंभीक ते उपांत्य विशारद तसेच गायनाच्याही प्रारंभिक व प्रवेशिका प्रथम अशा परिक्षांसाठी एकूण ६४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यातील सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत.

प्रारंभिक भरतनाट्यम परीक्षेत – स्वस्तिका वाघमारे, शरण्या तोडकर, सई काळे, दर्शना धुमाळ, रूही झंवर, प्रन्वी पिसाळ, जिज्ञा जाधव, देविका साळुंखे, ज्ञानेश्वरी झगडे, लक्ष्मीप्रिया पंतम, रेवती घोटनकर, गौरी धोंडे, प्रार्थना सुपलकर, सौ.ग्रीष्मा सुपलकर, गार्गी सोमवंशी, रिजुल शिंदे, अनुजा लगड, शांभवी क्षीरसागर, आद्यश्री व्यवहारे, लोषिता ताटी, गिरजा रायकर.

तसेच प्रवेशिका प्रथम परीक्षेत – आरोही चोपडा, स्वरा चोपडा, काव्या भंडारी, दिशा विधाते, नेहा ओहोळ, तनया येनगुल, वेरोणिका जाधव, विभावरी महेशन, रीचा दाभोळकर, मिर्तूश्री बाबू, ईश्वरी भापकर, आर्या गोले, चैत्रवेणी ताटी, डॉ. स्वप्नजा निरवणे, सौ. शिल्पा व्यवहारे, सौ.उर्मिला जठार, अनुष्का जठार, सौ.शितल घनगावकर, सौ. स्नेहल साळके, श्रावणी बनकर, अर्णवी कवाद, दुर्वा गायकवाड, शुभ्रा मस्तोळी, सिद्धी साळके.



अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या नोव्हेंबर २०२४ या सत्रातील परीक्षेत यशस्वी झालेले श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाचे विद्यार्थी.

तसेच प्रवेशिका पूर्ण परीक्षेत – तेजल मगजी व मध्यमा प्रथम या परीक्षेसाठी धृवी पोटे, धनश्री पवार, अनन्या तुंगार, समृद्धी कुटे तर मध्यमा पूर्ण परीक्षेत – प्रसन्न काकडे, प्रियंका करंजुले, तनिष्का शेळके, गार्गी शिंदे, निलाक्षी शर्मा, उत्कर्षा तांदळे, स्वरा जंगले तर विशारद प्रथम परीक्षेत – मृणाल घोडके व ईश्वरी काळे तसेच गायन प्रारंभिक परीक्षेत – माहीका अत्रि, श्रेयांश घोडके, सौ. माधुरी गोडबोले तर गायन प्रवेशिका प्रथम परीक्षेत शौर्या चौधरी, अंजली चौधरी. हे सर्व विद्यार्थी पास झाले आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या संचालिका नृत्य तपस्वी सौ. वर्षा पंडित यांचे मार्गदर्शन लाभले आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेत उत्तम आणि अभिमानास्पद यश मिळवले. त्याबद्दल विद्यालयाचे सह संचालक चंद्रकांत पंडित यांनी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्या पालकांचेही अभिनंदन केले.

## राज्यस्तरीय शब्दगंध युवा यशस्वी उद्योजक पुरस्कार प्रसाद भडके यांना जाहीर



नगर – राज्यस्तरीय शब्दगंध युवा यशस्वी उद्योजक पुरस्कार २०२५ प्रसाद भडके यांना जाहीर झाल्याची माहिती शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे यांनी दिली.

प्रसाद भडके हे गेल्या पंधरा वर्षापासून अर्थवेध इन्व्हेस्टमेंटच्या माध्यमातून आर्थिक सल्लागार म्हणून कार्यरत असून युवकांना जीवनात यशस्वी होण्यासाठीचे विविध प्रशिक्षण, नियोजन व मार्गदर्शन करत आहेत.

# स्पर्धेमधूनच व्यक्तिमत्व विकास होऊ शकतो

### अभिनेते मोहिनीराज गटणे यांचे प्रतिपादन; रोटरी मिडटाऊन वक्तृत्व करंडक स्पर्धेत जिल्ह्यातील ४८ शाळांच्या हजारहून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग



रोटरी क्लब अहमदनगर मिडटाऊनच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या शालेय वक्तृत्व करंडक स्पर्धेस जिल्यातील ४८ शाळांच्या हजार हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

नगर – विद्यार्थ्यांमध्ये वैचारिक बदल होतील असे चांगले विषय रोटरी मिटडाऊन वकृत्व करंडक स्पर्धेसाठी निवडण्यात आल्याने ही स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरली आहे. विद्यार्थ्यांनी कायम वक्तृत्व, कथाकथन सारख्या स्पर्धांमध्ये भाग घेत राहावे या स्पर्धेमधूनच पुढे तुम्हाला चांगला कलाकार होऊन तुमचा व्यक्तिमत्व विकास होऊ शकतो, असे प्रतिपादन सिने अभिनेते मोहिनीराज गटणे यांनी केले.

रोटरी क्लब अहमदनगर मिडटाऊनच्यावतीने अहिल्यानगर शहरात आयोजित करण्यात आलेल्या शालेय वक्तृत्व करंडक स्पर्धेस जिल्यातील ४८ शाळांच्या हजार हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दोन फेऱ्यांमध्ये झालेल्या या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील विजेत्यांमध्ये महाअंतिम फेरी पाईपलाईन रोड वरील मेरीलँड सभागृहात घेण्यात आली. या स्पर्धेचा परितोषिक वितरण मोहिनीराज गटणे व साहित्यिक संजय कळमकर यांच्या हस्ते झाले. यावेळी मिडटाऊनचे अध्यक्ष रो.अजय पिसुटे, सचिव रो.मार्लिन एलिशा, प्रोजेक्ट प्रमुख रो.ॲड.हेमंत कराळे, रो.प्रा.किरण कारला, मिडास सुझुकीचे संचालक संदीप भापकर आदी उपस्थित होते.

प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. अजय पिसुटे यांनी प्रस्ताविक केले.

साहित्यिक संजय कळमकर म्हणाले, मोबाईल व टीव्ही पासून काहीकाळ लांब ठेवून विद्यार्थ्यांना वाचन व मनन करायला लावणारी वकृत्व ही स्पर्धा आहे. त्यामुळे ही स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी खूप उपयुक्त आहे. मुलांमधील सुप्त गुण बाहेर आणण्यासाठी रोटरी मिडडाऊनचा हा उपक्रम चांगला आहे.

सूत्रसंचालन डॉ.प्रसाद उबाळे यांनी केले. रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष क्षितिज झावरे यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. मार्लिन एलिशा यांनी आभार मानले. स्पर्धेचे परीक्षण हेमलता पाटील, ज्येष्ठ साहित्यिक सदानंद भणगे, सुझॅन अब्राहम व खुर्शीद दमानिया यांनी केले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे – मराठी मध्यम इयत्ता पहिली ते चौथी गट प्रथम वेदांत मोरे पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कूल शेवगाव, द्वितीय सायली गिरी ज्ञानसंपदा स्कूल, तृतीय आरोही शिंदे भारदे हायस्कूल शेवगाव व उत्तेजनार्थ हुमेजा शेख भारदे हायस्कूल शेवगाव. पाचवी ते सातवी गट प्रथम सोहम वागस्कर जे एस एस गुरुकुल केडगाव, द्वितीय पृथ्वीराज पोटफोडे भारदे हायस्कूल शेवगाव, तृतीय श्रद्धा कोकाण तिलक जैन विद्यालय पाथर्डी व उत्तेजनार्थ आरुष बेडेकर रामकृष्ण इंग्लिश मीडियम स्कूल. इयत्ता आठवी ते दहावी गट प्रथम वरद लोखंडे अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल, द्वितीय प्रतीका डोंगरे ज्ञानसंपदा स्कूल, तृतीय वरद साखरे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व उत्तेजनार्थ नाविन्य वाघुले महाराणी ताराबाई कन्या विद्यालय केडगाव.

इंग्रजी मध्यम शाळा अंतिम निकाल पुढीलप्रमाणे – पहिली ते चौथी गट प्रथम माही दोडेजा माउंट लिटरेला झी स्कूल, द्वितीय आराध्य अग्रवाल माउंट रेट्रीला स्कूल, तृतीय रेडन अहुजा व उत्तेजनार्थ ध्वज मनोज मुनोत. पाचवी ते सातवी गट प्रथम स्वयम शिंदे सेंट मायकल स्कूल, द्वितीय रिशिता ढवळे सेंट विवेकानंद स्कूल, तृतीय अर्जुन पुरी एक्झिलियन कॉन्व्हेंट स्कूल व उत्तेजनार्थ आर्वी मंडोरे माउंट लिटरेला झी स्कूल. आठवी ते दहावी गट प्रथम अपूर्वा नांदुरकर सेंट विवेकानंद स्कूल, द्वितीय दृष्टि ललवाणी सेंट विवेकानंद स्कूल, तृतीय श्रद्धा गौड चित्रकूट विद्यालय व उत्तेजनार्थ स्वरा बिडवे अशोक भाऊ फिरोदिया स्कूल.

विजेत्यांना मोमेंटो, प्रमाणपत्र व रोख रक्कमेचे पारीतोषीके देण्यात आले. सर्वात जास्त विद्यार्थी सहभागी झाल्याबद्दलचे पारितोषिक पद्मभूषण बाळासाहेब भारदे विद्यालय शेवगाव आणि सर्वात जास्त बक्षीस प्राप्त विद्यार्थी पारितोषिक सेंट विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलला देण्यात आले.



अहिल्यानगर भाजपा ओबीसी शहर जिल्हा मोर्चा अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी एकूण सदस्यता नोंदणी संख्या अहिल्यानगर ओबीसी मोर्चाला दिलेले उद्दिष्ट पूर्ण केल्याने भारतीय जनता पार्टी प्रदेश पदाधिकाऱ्यांकडून त्यांचा सत्कार करण्यात आला.

# अहिल्यानगर भाजपाच्या ओबीसी मोर्चाने दिलेले उद्दिष्ट पूर्ण केल्याने प्रदेश पदाधिकाऱ्यांकडून कौतुक

### मुंबई येथील बैठकीत बाळासाहेब भुजबळ यांचा सत्कार

नगर – प्रदेश भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाची प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष यांची संघटन पर्व अभियान अंतर्गत आढावा बैठक प्रदेश कार्यालय मुंबई येथे झाली. या बैठकीत अहिल्यानगर शहर जिल्हा ओबीसी मोर्चाच्या वतीने २२५ विधानसभा मधील सदस्य नोंदणी अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले आहे. यामध्ये वेगवेगळ्या भागात चौकांचौकात तसेच घर चलो अभियान, प्रत्येक घरात जाऊन ओबीसी पदाधिकाऱ्यांनी मिस कॉल देऊन सदस्य व व्यक्तिगत सभासद नोंदणीचे काम केले आहे.

अहिल्यानगर भाजपा ओबीसी शहर जिल्हा मोर्चा अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी एकूण सदस्यता नोंदणी संख्या अहवाल आकडेवारीसह प्रदेश पदाधिकारी यांचेकडे सुपुर्द केला. यावेळी अहिल्यानगर ओबीसी मोर्चाला दिलेले उद्दिष्ट पूर्ण केल्याने भारतीय जनता पार्टी प्रदेश पदाधिकाऱ्यांकडून त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. तसेच बाळासाहेब भुजबळ यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रदेश ओबीसी कल्याणमंत्री अतुल सावे व सरचिटणीस तथा ओबीसी मोर्चाचे प्रभारी विजय चौधरी यांच्या प्रमुख उपस्थिती सरचिटणीस संजय केणेकर, मोर्चाचे सरचिटणीस मनोज ब्राह्मणकर, विनोद दळवी, बापूसाहेब घडामोडे, ओबीसी मोर्चाचे उत्तर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब गाडेकर आदी उपस्थित होते.

बाळासाहेब भुजबळ म्हणाले, अहिल्यानगर येथे भारतीय जनता पार्टीचे सदस्य नोंदणी अभियानाला प्रतिसाद मिळाला आहे. ओबीसी मोर्चाला दिलेल्या उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. तरी देखील यापुढील काळात पक्ष बळकटीसाठी सदस्य नोंदणी अभियानात ओबीसी मोर्चा चांगल्या पद्धतीने काम करेल, असे सांगितले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

